प्रकल्प प्रवर्तक मे. दिघी पोर्ट लिमिटेड, दिघी, तालुका-श्रीवर्धन - ४०० ०५१ आणि आगरदांडा, तालुका-मुरुड, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित बंदरे, ब्रेक वॉटर आणि ड्रेजिंग प्रकल्प वर्गवारीनुसार दिघी बंदराच्या विस्तारासाठी माल हाताळणी क्षमता १४०.० एम.एम.टी.पी.ए. प्रकल्प उभारणी करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त -

---

प्रकल्प प्रवर्तक मे. दिघी पोर्ट लिमिटेड, दिघी, तालुका-श्रीवर्धन - ४०० ०५१ आणि आगरदांडा, तालुका-मुरुड, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित बंदरे, ब्रेक वॉटर आणि ड्रेजिंग प्रकल्प वर्गवारीनुसार दिघी बंदराच्या विस्तारासाठी माल हाताळणी क्षमता १४०.० एम.एम.टी.पी.ए. प्रकल्प उभारणी करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी प्रत्यक्ष (physical) तसेच ऑन लाईन (Online) स्वरुपात सोमवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता अल्फा क्रिकेट क्लब मैदान, करलास, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगड येथे दुपारी ०२.०० वाजता आयोजित करण्यात आलेली होती.

बैठकीच्या सुरुवातीस श्री संदेश शिर्के, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,अलिबाग तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचा बैठक सुरु करण्यास थोडा अवधी लागल्याने दिलगिरी व्यक्त केली.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीत स्पष्टीकरण दिले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकन (ईआयए) अधिसूचना, २००६ नुसार ही पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती गठित करण्यात आलेली असून या समितीस प्रकल्प मंजूर करणे, नाकारणे

किंवा प्रकल्पाची शिफारस करण्याचा अधिकार नाही. प्रस्तवित प्रकल्पाविषयी स्थानिकांनी उपस्थित केलेल्या सूचना,विचार,हरकती किंवा आक्षेप यांची नोंद घेऊन बैठकीच्या इतिवृत्तात नोंद घेऊन सर्व दस्तावेजासोबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यासाठी आहे. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत योग्य ती निर्णय घेते. त्यांनी श्री संदीप टोपे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड (अतिरिक्त कार्यभार) तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीबाबत उपस्थितांना थोडक्यात माहिती सांगण्याची सूचना केली.

श्री संदीप टोपे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड (अतिरिक्त कार्यभार) तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संदेश शिर्के, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,अलिबाग तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री संजय भोसले, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी, पोलिस प्रशासन व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड,अलिबाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड यांच्यातर्फे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या

दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देशच प्रकल्प परिसरातील जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित तरतुदींनुसार **संवर्ग "अ" अनु.क्रं. ७ (ई) - बंदरे, ब्रेक वॉटर आणि ड्रेजिंग** प्रकल्प अंर्तगत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०१-०९-२०२२ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक ०७-११-२०२२ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्त करून पर्यावरण सल्लागार

यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण मार्च, २०२५ ते मे, २०२५ या कालावधीत पुर्ण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आला.

मा. जिल्हाधिकारी,रायगड,अलिबाग यांनी त्यांच्या पत्र दिनांक ०६.०७.२०२६ नुसार प्रत्यक्ष (physical) तसेच ऑन लाईन (Online) स्वरुपात सोमवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता अल्फा क्रिकेट क्लब मैदान, करलास, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगड येथे दुपारी ०२.०० वाजता पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यास संमती दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार खालील पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी,रायगड,अलिबाग, **-अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(उप विभागीय दंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई **-सदस्य**
यांचे प्रतिनिधी -
प्रादेशिक अधिकारी - रायगड,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई - ४०० ६१४

३) उप प्रादेशिक अधिकारी, **-आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सागर,रायगड यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक ११ जुलै, २०२६ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified)/ कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य झोन, न्यु सेक्रेटरीएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१
२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड,अलिबाग,
३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड,अलिबाग
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड,अलिबाग,
५) उप विभागीय अधिकारी, श्रीवर्धन, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा -रायगड,
६) उप विभागीय अधिकारी, मुरुड, तालुका-मुरुड, जिल्हा -रायगड,
७) तहसीलदार, तहसील कार्यालय,श्रीवर्धन, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा- रायगड,
८) तहसीलदार, तहसील कार्यालय,मुरुड, तालुका-मुरुड, जिल्हा- रायगड,
९) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगड,
१०) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, तालुका-मुरुड, जिल्हा-रायगड,
११) मुख्याधिकारी,श्रीवर्धन नगरपरिषद,तालुका-श्रीवर्धन,जिल्हा-रायगड,
१२) मुख्याधिकारी,मुरुड नगरपरिषद,तालुका-मुरुड,जिल्हा-रायगड,
१३) प्रादेशिक उपवनसंरक्षक, रोहा,तहसील कार्याजवळ,रोहा-चाणेरा रोड, मु.पो. व तालुका-रोहा,जिल्हा-रायगड-४०२ १०९
१४) प्रादेशिक बंदर अधिकारी, राजपुरी बंदरे समुह, जुने भाजी मार्केट रोड, ता.-अलिबाग,जिल्हा-रायगड- ४०२ २०१

१५) प्रादेशिक अधिकारी,रायगड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४,

१६) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुख्यालय, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१७) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

१८) सहसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, रायगड, ६ वा मजला, कोकण भवन विस्तार,सीबीडी बेलापूर,नवी मुंबई

१९) सह मुख्य विस्फोटक निरिक्षक, अ-१ व अ-२ विंग, पाचवा मजला, सीजीओ कॉम्प्लेस, सीबीडी बेलापूर,नवी मुंबई

२०) उप प्रादेशिक कार्यालय-महाड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,सी.एफ.सी. इमार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसर, तालुका-महाड,जिल्हा-रायगड- ४०२ ३०९

२१) **<u>तालुका-श्रीवर्धनः-</u>** ग्रामपंचायत कार्यालये-
दिघी, कुडगांव, सर्वे, आडगांव,हारवीत,कुडकी,वेळास,वडवली,

२२) **<u>तालुका-म्हसाळा-</u>**ग्रामपंचायत कार्यालये-
कालसुरी,रोहिणी,तुरुंदबाडी,
<u>तालुका-मुरुड-</u> ग्रामपंचायत कार्यालये-

२३) आगारदांडा,सावळी,राजपुरी,एकदरा,अंबोली,तेलवडे,

२४) **<u>तालुका-रोहा- ग्रामपंचायत कार्यालये-</u>**
भालगांव,

२५) **<u>तालुका-तळा, ग्रामपंचायत कार्यालये-</u>**
मांदड

२६) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई - मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड यांना एकूण ९६ सूचना/आक्षेप विविध सूचित कार्यालयाकडून/प्रत्यक्ष/पोस्टाने प्राप्त झालेले आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप,हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले.

प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की शासनाने अधिसूचित केलेल्या क्षेत्रातच हे प्रस्तावित विस्तारिकरण ज्यास मास्टर प्लॅन म्हटले आहे, ते होणार आहे. येथे भूसंपादन करण्याची गरज नाही, त्यामुळे विस्तापितांचे पुनर्वसन करण्याचा प्रश्नच येत नाही. तसेच येथे हवाई अंतर (aerial distance) घेण्यात आलेले आहे. प्रकल्प क्षेत्रात खारफुटी/मँग्रोस हे येत नाहित. प्रकल्प सुरु झाल्यानंतर देखभाली खर्च साधारणपणे ₹ ५.५० कोटी (रुपये साडेपाच कोटी) राखून ठेवलेला आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पामुळे स्थानिक विविध उद्योग व व्यवसायांना चालना मिळेल. देशातील पउत्पादन व व्यापाराला पाठबळ मिळेल, कुशल व अकुशल रोजगाराची निर्मिती होईल.

सादरीकरणानंतर उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी त्यांच्या पर्यावरणीय सूचना,विचार,हरकती नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले. सूचना उपस्थित

करताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गावाचे नांव सांगण्याचे आवाहन करण्यात आले. त्याचप्रमाणे ज्यांना लेखीस्वरुपात निवदने द्यायची असतील, त्यांनी ती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधीस द्यावीत, त्याची पोच देण्यात येईल अशी सूचना करण्यात आली.

<u>उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणेः-</u>

१) **<u>एडव्होकेट रामचंद्र कानू मेंदाडकर, मुक्काम पोस्ट-दिघी तालुका-श्रीवर्धन, तालुका-रायगडः-</u>**

प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आलेले नसून आपल्या संपुर्ण परिसराचे, कोळी समाजाचे बाधिकरण करण्यात येणार आहे हे स्पष्ट होते. या प्रकल्पामुळे आपला जीवनमरणाचा प्रश्न उभा राहिलेला आहे. माझी प्रकल्प प्रवर्तकांना विनंती आहे की त्यांनी ToR चा २०२२ चा उल्लेख केला. त्यांनी पुन्हा ते पत्र पहावे. आता २०२६ चालू आहे. माझ्या चारित्र्याबद्दल, कामाबद्दल आयोजकांनी चौकशी करावी. मी कोणासमोर झुकलेला नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी प्राप्त केलेल्या टीओआरचे उल्लंघन केलेले आहे. प्रकल्पास-दिघी पोर्टला दिनांक ०७-११-२०२२ रोजी टीओआर प्राप्त झाला. त्यातील कलम नं.IV नुसार पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाच्या प्रति या स्थानिक भाषेत येथे मराठीत जनसुनावणीच्यी तीस दिवस अगोदर उपलब्ध करुन देण्याचे निर्देश आहेत. त्यांनी उपस्थितांना मराठी प्रत मिळाली का याबाबत विचारणा केली. सर्व उपस्थितांनी एकमताने नकार दिला. त्यामुळे ही जनसुनावणी बैठकच बेकायदेशीर आहे. कारण आपल्याला ईआयए अहवाल हा मराठीत मिळालाच पाहिजे. तो तीस दिवस अगोदरच सर्व प्रकल्प प्रभावित क्षेत्रातील ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेलाच पाहिजे. तो झालेला नाही. तसेच सदररहू ईआयए अहवाल हा मराठीत भाषांतरित केलेला ग्रामस्थांना मिळायलाच हवा. तो मिळालेला नाही. म्हणजे ही जनसुनावणी (public consultation) ही एक फार्स आहे.

जनसुनावणीसाठीचे अध्यक्षच हे उशिरा आलेले आहेत. शासकीय अधिका-यांना प्रोटोकॉल पाळणे बंधनकारक असतानाही ते उशिरा आलेले आहेत. तुम्ही प्रथम आदर्श पाळणे महत्वाचे आहे.

आम्ही विरोधासाठी विरोध करत नाही पहिले आपली विकासाच्या नावाखाली भकासाची घंटा ०३ सप्टेंबर, २००५ रोजी वाजली. त्यात विशेष (specific) अटी आणि शर्ती दिलेल्या आहेत, त्या खालीलप्रमाणेः-

<u>अट नं.१-</u> सर्वांना मोफत पिण्याच्या पाणी पुरविणे- तर मी, चिंतामणी आणि कमळापूरकर चांदेकर आम्ही २००९ मध्ये पी.आय.एल. दाखल करण्यापुर्वी या दिघी पोर्टने एकतरी अटी व शर्ती येथील ग्रामस्थांना दिलेल्या आहेत का याबाबत विचारणा केली असता सर्वांनी ओरडून नाही सांगितले. आपल्या कोणाला पिण्याचे पाणी मोफत पुरविण्यात आलेले आहे काय? सर्व उपस्थितांनी सामुहिकपणे नाही असे उत्तर दिले.

प्रकल्प प्रवर्तक फक्त येथे eye-wash करत आहेत.

माझ्या विरुध्द भांडवलदारांनी मोठमोठे विधिज्ञ उभे केले, मात्र त्यास नमलो नाही. साधे पिण्याचे पाणीसुध्दा दिघी पोर्ट व्यवस्थापन देऊ शकले नाही. तसेच नंतर ग्रामस्थांना पाणी मिळत नाही. तर असा सरकाराल दिघी पोर्टने अहवाल दिला की दिघीच्या विहिरी पाणी पितात.

टीओआरनुसार जोपर्यंत दिघी परिसराला जोपर्यत पूर्णपणे वीजपुरवठा व पाणीपुरवठा होत नाही, तोपर्यंत त्या टीओआरच्या निर्देशांचे संपूर्णपणे उल्लंघन होत आहे. येथील दिघी परिसरातील ग्रामस्थ हे विहिरीचे पाणी पित आहेत.

त्यांनी वचन दिले वीजपुरवठा करण्यात येईल, तो दिलेला नाही. दिघी पोर्ट क्षेत्रातील गावांना दिघी पोर्ट व्यवस्थापनाने मोफत वीजपुरवठा केलेला आहे का या बाबत विचारणा केली. सर्व उपस्थितांनी एकत्रित नकार दिलेला आहे.

तसेच ३०-०९-२००५ ज्या टीओआर अटी व शर्तीनुसार येथील दिघी क्षेत्रातील युवक-युवती ज्या दहावी/बारावी उतीर्ण आहेत, त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. त्यांनी उपस्थितांना प्रश्न विचारले की कोणाकोणाला प्रशिक्षण देण्यात आलेले आहे?सर्व उपस्थितांनी कोणालाही प्रशिक्षण देण्यात आले नसल्याचे सांगितले. दुसरी अट

म्हणजे फिशरिज निगडीत प्रशिक्षण देण्यात यावे. त्यांनी परत सर्व उपस्थितांना फिशरीज निगडीत प्रशिक्षण दिले का याबाबत विचारणा केली. सर्व उपस्थितांनी नकार दिला.

एडव्होकेट मेंडाळकर यांनी आक्षेप नोंदविला की अटी व शर्ती या फक्त कागदावरच आहेत. म्हणजे ३-०९-२००५ च्या अटी व शर्तींचे उल्लंघन करण्यात आलेले आहे.

आता त्या ३०-०९-२००५ च्या टीओआरनंतर दोन शुध्दीपत्रे पारित करण्यात आलेली आहेत.

आधि दिघी पोर्टने लहान बंदर (Minor Port)म्हणून अर्ज केला. आता जगातील सर्वात मोठे बंदर विकसित करण्याचे प्रयत्न चालू आहेत. येथील जनतेस सांगण्यास वाईट वाटते की जरी हा प्रकल्प पूर्ण झाला,तर दिघी बंदर हे जगातील सर्वात मोठे बंदर असेल, मात्र येथील स्थानीक गावे व स्थानीक मच्छिमार राहतील किंवा नाही याबाबत काहीही सांगता येणार नाही.

सादरीकरणात दर्शविण्यात आलेले नाही, मात्र दिघी बंदारापासून १,९५० मीटर्स म्हणजे २.० कि.मी. जेटी बाहेर येणार आहे. भराव टाकत असाताना उत्खनन करावे लागेल म्हणजे तेथील मासे मरणार आहेत. एकूण भांडवली ड्रेजिंग (capital dredging) हे ६०.० दशलक्ष घनमीटर होणार आहे. म्हणजे एकूण ११४.० दशलक्ष क्युबिक मीटर एवढे ड्रेजिंग होणार आहे. ड्रेजिंग म्हणजे आपल्या मृत्यूची घंटा आहे. तसेच ड्रेजिंगसाठी पाण्याची गरज ५०.० एमएलडी एवढी लागेल. त्यासाठी आपल्या परिसरातीलच पाणी घेण्यात येणार आहे. प्रस्तावित प्रकल्पासाठी भराव ३०४.० हेक्टर होणार असून एकूण भराव हा ५८४.५ हेक्टर एवढा होईल.

ग्रामस्थांतर्फे मी २८ पाने हरकती व आक्षेप लेखी स्वरुपात नोंदविलेले आहेत. त्यात प्रस्तावित प्रकल्पामुळे होणारे दुष्परिणामसुध्दा लिहिलेले आहेत. त्यातील काही मुद्दे:-

अ)	प्रस्तवित प्रकल्पाबाबतचा अहवाल हा एकतर्फी आहे,
आ)	ड्रेजिंगसाठी स्फोट करावे लागणारच. त्यामुळे जवळील मुरुड-जंजिरा किल्ल्या जो ०.१६ कि.मी.अंतरावर आहे, त्यास चिरा पडतील,

इ)	प्रकल्प प्रवर्तक भांडवलदार असल्याने अभ्यास करणार नाहीत. पण प्रकल्पाचे सल्लागार आदित्य एन्व्हॉयरमेंटल सर्व्हिसेस प्रा.लिमिटेड यांनी Maharashtra Marine Fishing Regulation Act, 1981 वाचलेलासुध्दा दिसत नाही. या कायद्याला तिलांजली दिलेली आहे.
ई)	प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पात उत्तरेस आगरदांडा बाजूस - १९५०.० मीटर मल्टीपरपझ बर्थ+ दक्षिण बाजूस (दिघी बाजूस) - ४२५.० मीटर मल्टीपरपझ बर्थ विकसित करण्यात येणार आहे. तर दक्षिण बाजूस स्मशानभूमीकडे वा लाईटहाऊसकडे जाणार आहात का याबाबत भूमिका स्पष्ट करण्यात यावी.
उ)	ड्रेजिंगमुळे माशांची अंडीच नष्ट होणार आहेत. तर मासे कसे उत्पन्न होतील. येथील ७८% विविध प्रकारचे मासे हे नष्ट झालेलेच आहेत. या प्रकल्पामुळे पर्यावरणाचा -हासच होणार आहे.
ऊ)	आमची प्रकल्पाला पूर्ण विरोध आहे. येथील प्रकल्पबाधित मोबदलासुध्दा घेणार नाहीत.
ओ)	असे सांगण्यात आले की प्रकल्प जागा मा.बॅरिस्टर अंतुलेसाहेबांनी मच्छिमारांच्या जेटीसाठी दिलेली आहे. नंतर असे सांगण्यात आले की ती मच्छिमारांसाठी नसून ती सिकॉमसाठी आहे. नंतर प्रस्ताव आला का ती जागा माझगाव डॉकला देणार. नंतर ती जागा दिघी पोर्टला दिली.
अं	भारतीय राज्घटनेने कलम २१ नुसार आपणास जगण्याचा हक्क दिलेला आहे. मात्र ही अदानी प्रकल्प आपल्याला जगूच देणार नाही.
ब)	या प्रकल्पामुळे पर्यावरणाचा -हासाबरोबर जंजिरा किल्ल्यास धोका आहे. तसेच समुद्र आमचा हक्काचा आहे, घटनेने जाण्या-येण्याचा बोटीने जो अधिकार दिलेला आहे, त्याचे उल्लंघन होणार आहे.
बा)	हा प्रकल्प म्हणजे पर्यावरणाचा -हास होणारा प्रकल्प आहे, पर्यावरणास धोकाच उत्पन्न होणारा प्रकल्प आहे. म्हणून आम्हाला हा प्रकल्पच नको आहे.

हा जनआक्रोश पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी नोंदवावा. आमच्या अस्तित्वाचा व अस्मितेचा प्रश्न येथे उपस्थित झालेला आहे. हा समुद्र ही आमची शेती आहे, ती आम्ही अदानीला देणार नाही.

२) **<u>श्री संकेत गीते, राहणार-तुरुंगवाडी, सामाजीक कार्यकर्ता, कोळी समाजाचा एक निष्ठावंत कोळीः-</u>**

तुरुंगवाडी गावात येथे ९७.२७% अनुसुचित जाती जमातीचा असून कोळी समाजाचा आहे. म्हणजे आम्ही आदिवासी (tribal) आहोत. तुरुंगवाडी गाव हा आदिवासी (tribal), मच्छिमार (fisherman) आहे. हे सर्व माझे बांधव आहेत, आम्ही सर्व आदिवासी समाजाचे आहोत.

पेसा कायदा, आदिवासी कायद्यांतर्गत येथे बैठकीसाठी येथील विभागीय आयुक्त (कोकण विभाग) असणे बंधनकारक असतानाही ते येथे उपस्थित नाहीत. भारताची राज्यघटनेतील कलम २१, ४६, ४८ए, ५१एजी नुसार हे आमचे क्षेत्र आहेत. बैठकीस आलेली ही भोळीभाबडी जनता मागणी करत होती की आम्हांला सादरीकरण दिसतच नाही. तर या आदिवासी जनतेस काय माहिती की येथे कसला प्रकल्प येणार आहे? मी कळकळीची विनंती आहे की आमच्या जमिनी नाहित, तर आमचा जो काही आहे, तो समुद्र आहे. जर तोही आमच्याकडून काढून घेणार, तर आम्ही करणार काय?

मी सामाजीक कार्यकर्ता असल्याने मी जे बोलायचे ते कागदावरच लिहिणार व आपणास जे काही मांडायचे ते कागदावरच द्यावे. कारण ही लढाई सोपी नाही.

येथे प्रकल्प प्रवर्तक सांगतात की येथील घरांना काहीही त्रास होणार नाही. येथील पर्यावरणास काहीही नुकसान होणार नाही. तरी अदानी कंपनीने तसे लिहून द्यावे व शासन प्रशासनाने त्यानुसार परिपत्रक काढावे. शासनाने आमची घरे, आमचे पर्यावरण यास त्रास होणार नाही, याबाबत प्रशासकीय पत्र द्यावे. आमचा लढा हा सर्व कोळीबांधवांसाठी आहे. पुढील पंधरा दिवसात जर हा प्रकल्प शासनाने रद्द केला नाही, तर मी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार आहे. माझा जीव गेला तरी चालेल. मी मेलो तर कोळी बांधवांसाठी, जगलो तर कोळी बांधवांसाठी.

आता येथे वाईट वाटते की आपण निवडून दिले, ते लोकप्रतिनिधी कुठे आहेत? त्यांना आपण मते दिली ते खासदार, आमदार कुठे गेलेत? मी कुठल्याही पक्षाच्या बाजूने बोलत नाही. मी माझ्या समाजाबाबत बोलत आहे. तरी याबाबत शासनाने

आपला अहवाल कळवावा. अन्यथा मी माझ्या उपोषणाबाबत जनतेसमोर जाहिर प्रतिक्रिया देणार आहे.

हा लढा आमच्या सर्व कोळीबांधवांचा आहे. तरी मी माझ्या बांधवांना आवाहन करतो की कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नका. सर्व लढाई ही आपण चालू ठेवणार आहोत. आपण एकजुटीने लढलो, तर एकजुटीचाच विजय असतो हे लक्षात घ्यावे. तरी पुढील लढाईसाठी तयार राहावे.

३) <u>एडव्होकेट चिंतामणी बणगोजी, राहणार-दिघी, तालुका-श्रीवर्धन,जिल्हा-रायगडः-</u>

मी दिघीचा पुत्र असून जातीने कोळी आहे. म्हणून मी तुमच्यासमोर प्रस्तावित प्रकल्पाविषयी दोन शब्द बोलत आहे. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण केले. ते फक्त पाठ करुन आल्यासारखे बोलले. त्यांनी लोकांना कळत आहे किंवा नाही याचा विचार न करता त्यांनी सादरीकरण केले.

मात्र सर्वजणांनी एक गोष्ट दुर्लक्षित केलेली होती की प्रस्तावित प्रकल्पासाठी break water भिंत बांधायची आहे, ती जहाजे माल घेऊन येणार आहेत, त्यात विषारी केमिकल्स असणार, ती आल्यानंतर त्यातून उतरविणार माल खाली पडला, किंवा गोडाऊनला साठवून ठेवला, तर त्याला समुद्राचे पाणी लागू नये, म्हणून ती भिंत बांधणार आहेत.

पण आपण जे पिढ्यानपिढ्या येथे राहत आहोत, त्यांच्या व्यवसायासाठी, छोट्या मच्छिमारांच्या व्यवसायाबाबत अहवालात कुठेही उल्लेख नाही. लहान मच्छिमारांच्या व्यवसाय संरक्षणाबाबत कोणतीही तरतुद करण्यात आलेली नाही. म्हणजे अगोदर काहीही करायचे नाही, नंतर थोडी सवलत घेऊन सर्व जागा घ्यायची, म्हणजे लहान मच्छिमार स्वतः सोडूनच जातील व सर्व क्षेत्र कंपनीस मिळेल, असाच कंपनीचा डाव आहे.

आता प्रकल्प अहवालात आहे. पण आपणास माहित आहे की प्रकल्पात दोन गट आहेत. एक आगरदांडा तर एक दिघीच्या बाजूस आहे. प्रकल्पात उत्तरेस आगरदांडा व दक्षिण बाजूस दिघी येथे प्रकल्प उभारणी करण्यात येणार आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी २३ फेब्रवारी २०२२ रोजीच्या अहवालात धक्क्यांचे माप, धक्का किती मोठा होणार आहे, हे नमुद केलेले आहे.

मात्र २३ फेब्रुवारी, २०२६ च्या पर्यावरणीय अनुमतीत कुठेही धक्का होणार याचा उल्लेख नाही. मात्र तुमच्या अहवालात कसे आले? याबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर देणे अपेक्षित आहे. म्हणजे स्थानिकांची मागणी आहे जर टी.ओ.आर.मध्ये परवानगी नाही, तर प्रकल्प अधिकारी धक्का कसा बांधू शकतील.

सादरीकरणात दर्शविण्यात आलेले आहे की प्रकल्प स्थानापासून जंजिरा किल्ला हा ०.१६ कि.मी. लांब आहे. तर त्यासाठी संबंधित विभागाची विशेष परवानगी लागते, ती पूर्वपरवानगी घेण्यात आलेला आहे का? याचा उल्लेख अहवालात नाही. तसेच जर जंजिरा किल्ल्याला नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार?

अहवालात १.८.९ मध्ये स्पष्टपणे लिहिलेले आहे की - देखभाल ड्रेजिंगमुळे सागरी पर्यावरणीय गुणवत्तेवर परिणाम होणार आहे, जहाजांच्या प्रवासामुळे समुद्राच्या पाण्याची गुणवत्ता खालावणार, तसेच सांडलेला माल व तेल गळती यामुळे सागरावर परिणाम होणार -तरीही आपण या प्रकल्पास पाठिंबा देणार का - सर्वांनी एकमताने नकार दिला.

तसेच प्रकल्पात जे ड्रेजिंग करणार आहेत, त्यामुळे माशांची अंडी,शिंपले हे कायमचे नष्ट होणार आहेत. छोटे मच्छिमार हे कायमचे नष्ट होणार आहेत. त्यामुळे या प्रकल्पास माझा स्पष्ट विरोध आहे व आपणही एकमताने विरोध करावा.

अहवालात सीएसआर उपक्रमासाठी २०२४-२५ मध्ये सामुदायिक आरोग्यासाठी १३९.७९ लाख खर्च केले असा उल्लेख आहे. तर शिक्षणासाठी ३२.६० लाख एवढा खर्च केलेला आहे. त्यांनी उपस्थितांना प्रश्न विचारला की एवढा आपल्या गावात खर्च केला आहे काय, तर सर्वांनीच नकार दिला.

मग प्रकल्प व्यवस्थापनाने ही खोटी माहिती अहवालात दिलेली आहे. कंपनीने लिहिलेले आहे की आपल्या परिसरात २०२४-२५ मध्ये सामुदायिक आरोग्यासाठी १३९.७९ लाख खर्च केले आहेत. एक साधी रुग्णवाहिका (ambulance) आपल्या गावात नाही. म्हणजे हा अहवाल खोटा, चुकीचा लिहून

स्थानिकांची जाणूनबूजून दिशाभूल करण्यात येत आहे. मासेमारी महत्वाची आहेच, मात्र जरी गावासाठी काहीही केलेले नाही, तरीही अहवालात सांगत आहे की त्यांनी केले.

दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ च्या पर्यावरण अनुमतीत दिघाच्या बाजूला कोणताही धक्का होईल असे नमूद केलेले नाही. मात्र सादरीकरणात व कंपनीच्या अहवालात आगरदांडा व दिघीलाही धक्का होणार असे नमूद केलेले आहे. जर शासनाची मान्यता नाही, तरीही हे स्थानिकांच्या माथी का लावत आहेत?

आम्ही भूमीपुत्र असून आमचा हक्क आहे, मात्र दिघी पोर्टने भूमीपुत्रांना नोकरीची संधि दिलेली नाही. फक्त सांगतात की प्रकल्पात स्थानिकांना नोकरी दिलेली आहे.

तरी प्रकल्पास सर्व ग्रामस्थांचा विरोध आहे.

४) <u>एडव्होकेट कमलाकर कांदेकर, राहणार-दिघी, तालुका-श्रीवर्धन,जिल्हा-रायगडः-</u>

मला फक्त ईआयए अहवालातील विसंगती दाखवायची आहे. अहवालात आदिवासी समाजाचे सत्य आणि खरी परिस्थिती सांगितलेली नाही. म्हणून सदरहू ईआयए अहवाल हा नाकारण्यात यावा.

आता ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही दिघी पोर्ट लिमिटेड यांच्या प्रस्तावित ब्रेक वॉटर व ड्रेजिंग काम हे कार्गो हाताळणी १४०.० एम.एम.टी.पी.ए विस्तारिकरण प्रकल्पासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. म्हणजे हा प्रकल्प हा जेएनपीएपेक्षा जास्त मोठा होणार आहे.

दिघी पोर्ट लिमिटेडने २००८ साली १३ (तेरा) कोळीवाड्यांसोबत सामंजस्य करार केला. त्या सामंजस्य करारात करण्यात आलेल्या अटी व शर्तींची पूर्तता अद्यापपावेतो करण्यात आलेली नाही. PIL No. 42/2009. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्णयावर माझे नांव आहे.

त्यांनी त्यांच्या सूचना/आक्षेप नोंदविण्याची विनंती केली.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की भारत सरकारच्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकन, (ईआयए) अधिसूचना, २००६ नुसार सर्व पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येते. तसेच उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची नोंद घेण्यात येते.

एडव्होकेट कांदेकर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी पारित केलेल्या निर्णयातील पान नं. ७२ वरील काही मुद्दे बैठकीत सर्वांना इंग्रजीत वाचून दाखविले.

मा. उच्च न्यायालयाने असे आदेश दिलेले आहेत की जोपर्यंत अटी व शर्ती या पूर्ण (fulfill) करत नाहीत, तोपर्यंत प्रकल्प प्रवर्तक (दिघी पोर्ट लिमिटेड) यांना पुढचे पाऊल टाकताच येणार नाही. म्हणजे मा. उच्च न्यायालयाने पारित केलेले आदेशाची पूर्तता झालेली नाही.

तरी मला येथे शासनास विचारणा करावयाची आहे की शासनाने उच्च न्यायालयाच्या आदेशांची पूर्तता झाली वा नाही याबाबत चौकशी केलेली आहे काय? तसेच प्रकल्प अधिका-यांनी पुढील काम करण्यास ज्या मशिनरी लावलेल्या आहेत, तेही अवैध आहे.

एडव्होकेट कांदेकर यांनी आक्षेप नोंदविताना सांगतले की जोपर्यंत प्रकल्प प्रवर्तक न्यायालायाचे आदेशांची पूर्तता करत नाही, तोपर्यत त्यांनी पुढील काम आम्ही करुच देणार नाही.

एडव्होकेट कांदेकर यांनी आक्षेप नोंदविला की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा नाबेट मान्यताप्राप्त मुंबईच्या आदित्य एनव्हायर्मेंटल सर्व्हिसेस प्रा. लिमिटेड यांनी केलेला आहे. हा अहवाल एप्रिल, २०२६ रोजी तयार करण्यात आलेला आहे. मात्र नाबेट ही संस्था पूर्णपणे वेगळी आहे. या प्रकल्पासाठी Coastal & Off Shore Engineering Laboratory , Govt. of India Central Water Park Research Center यांना याबाबत अहवाल देणे अपेक्षित होते. कारण bio-diversity, coral याची काय माहिती आहे? आम्हाला हा अहवाल मान्य नाही. यांनी कोविड कालावधीत हा अहवाल तयार केला, एप्रिलमध्ये सादर केला आणि ऑगस्टमध्ये जनसुनावणी आयोजित केलेली आहे.

अहवालात लिहिलेले आहे की येथून जवळचे विमानतळ हे छत्रपती शिवाजीमहाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ हे आहे. या त्रुटी दुरुस्त करण्यात आलेल्या नाहीत. National Data is not considered, not provided and nor it is considered meticulously.

अ)गुणवत्ता विचार करताना ईआयए अहवाल पान नं. १५, जो direct and secondary डेटा घेतलेला आहे - त्याचा ऊहापोह केलेला नाही.

आ)पान नं.१९ - Details of handling in cargo storage

इ)पान नं.२२ - details of litigation pending against the project

ई)Your answer is - there is no litigation pending -ही खोटी माहिती दिलेली आहे.

उ)पान नं. २३ - the recommendations of MCZM shall be noted and submitted असे लिहित आहात. हे अगोदरच कसे लिहिले, म्हणजे तुम्हांला आधीच कळले का की MCZM काय सांगणार आहे?

ऊ)पान नं. २६ - ईआयए अहवालातील पॅरा

ए)Public Consultation - ईआयए अहवालातील पॅरा

औ)उच्च न्यायालय आदेश - पुर्तता का केली नाही. - हे आदिवासी समाजाचे लोक आहेत. रंजलेले, गांजलेले लोक आहेत.

अं) पान नं. ६२ - पाणीपुरवठा - त्यात लिहिलेले आहे की महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी झालेल्या करारानार ०.६ एमएलडी पाणी जवळच्या गावांना - दिघी, हरवित, कुडगाव यांना पुरवठा करण्यासाठी.

एडव्होकेट कांदेकर उपस्थितांना प्रश्न केला त्यावेळी असा पाणीपुरवठा करण्यात आलेला नसल्याचे सांगण्यात आले.

क) उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दिघी गावाला शंभर टँकर्स रोज पुरविणे बंधनकारक असतानाही प्रकल्प प्रवर्तक यांनी पाणी पुरवठा केलाच नाही.

जोपर्यत उच्च न्यायालयाचे आदेशांचे पालन होत नाही, तोपर्यत हे आंदोलन चालूच राहिल.

का) कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधी- दिघी गावात खर्च करण्यात आला नाही - तो दुसरीकडे वापरण्यात आला. एकही सामजिक विकास योजना दिघी गावात राबविण्यात आलेली नाही.

कि) पान नं. २७० - २०१६ चा जनगणना डेटा - आपण लिहिलेले आहे की ३७%लोक हे दारिद्यरेषेखाली राहतात. मात्र दारिद्र्यरेषेच्या वर राहणा-या लोकांबाबत काहीही लिहिलेले नाही.

की) पान नं. ३०४ - अहवालातील सत्याची पडताळणी नाही

सरकारने सामाजिक न्यायाची हमी घेतलेली आहे.

तरी आम्ही हे होऊ देणारच नाही. प्रकल्प प्रवर्तकांनी केलेले सर्वेक्षण, bio-diversity survey आम्हांला मान्य नाही. हा आमचा आक्षेप आहे.

कु) कोव्हीड काळात २०२२ ला ईआयए अहवाल तयार केला,चार वर्षांनी २०२६ ला सादर केला, प्रकल्प सल्लागार यांनी आमच्या आदिवासी बांधवांना मानसिक त्रास देण्यासाठी असा अहवाल - ईआय़ए दिला. तो आम्हांला मान्य नाही.

कू) येथे आपणास सुप्रीम कोर्टाचा एक निर्णयाबाबत माहिती देत आहे - In the Matter of Jagannath V/s Union of India

निर्णयाची माहिती उपस्थितांना देण्यात आली.

वरिल याचिकेत मा. सुप्रीम कोर्टाने पारित केलेल्या निर्णयानुसार आमचा प्रस्तावित प्रकल्पास पूर्ण विरोध आहे.

एडव्होकेट कांदेकर यांनी प्रतिपादन केले की मा. अध्यक्ष यांनी बैठकीच्या सुरवातीसच सांगितले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही स्थानिकांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना/आक्षेप जाणून घेण्यासाठी आहे. बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन त्याचा इतिवृत्तात समावेश करण्यात येईल. सदरहू इतिवृत्त प्राप्त लेखी सूचना/आक्षेप यांच्यासह अध्यक्ष यांच्या सहीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

यांच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेईल.

तरीही आपण प्रस्तावित प्रकल्पास पर्यावरण अनुमती (ईसी) प्रदान करण्यास पूर्ण विरोध आहे अशा स्थानिकांच्या भावना भारत सरकारला कळवाव्यात.

एडव्होकेट कांदेकर यांनी पुढे आक्षेप नोंदविला की प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरण सल्लागार यांनी तयार केलेला पर्यावरण प्रभाव मुल्यांकन (ईआयए) अहवाल पूर्णपणे चुकीचा, दिशाभूल करणारा आहे. वास्तवापेक्षा बराच चुकीचा आहे. तो आम्हा स्थानिकांना मान्य नाही. तरी आम्ही सर्व स्थानिक या चुकीच्या अहवालावर आयोजित करण्यात आलेल्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीवर आक्षेप नोंदवित आहोत.

त्यावेळी एका स्थानिकांनी सर्व उपस्थितांना आवाहन केले की प्रत्येकाने आपले म्हणणे हे थोडक्यात व मुद्देसुद मांडावेत. येथे तेरा गावातील प्रत्येक प्रतिनिधी उपस्थित असून शिवाय त्यांच्याबरोबरच स्थानिकांना सूचना/आक्षेप नोंदविण्याचे आहेत.

५) <u>श्री नथुराम बाबू माळी, राहणार-टोकेखार, पोस्ट-सावली, तालुका-मुरुड, जिल्हा-रायगडः-</u>

या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीची नोटीस आम्हांला तीस दिवस अगोदर ग्रामपंचायत कार्यालयात मिळणे बंधनकारक असताना ती मिळाली नाही. ती माहिती आम्हांला तहसीलदार कार्यालयात मिळाली. आम्ही प्रकल्पग्रस्त आहोत.

माझ्या अगोदर जे सर्व वक्ते बोलले, त्यांनी पूर्णपणे या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची चिरफाडच करून टाकलेली आहे. त्यांनी सर्व कायदेशीर मुद्दे खूपच छान मांडलेले आहेत.

येथे इंदापूर-आगरदांडा राष्ट्रीय महामार्ग झाला- ५४८ ब. त्यावेळी ज्यांची जमिन जात होती, त्या शेतक-यांना, प्रकल्पग्रस्तांना नोटिस न देता प्रत्यक्ष काम सुरु केले. जेव्हा आम्ही जनआंदोलन केले, त्यावेळी काम बंद करुन सतरा दिवसांनी सूचना काढली. तेथे फक्त चार लोकांनाच नोटीस पाठविण्यात आल्या. आम्ही जनआंदोलन, पत्रव्यवहार केल्यानंतर १६९ लोकांना नोटिस् पाठविण्यात आल्या.

अजूनसुध्दा एमएसआरडीसीकडून आम्हांला मोबदला मिळालेला नाही. आम्ही मा. जिल्हाधिकारी यांची भेट घेतली, तर ते सांगतात प्रांताधिकारी यांना भेटा.

आम्ही विकासाच्या विरुध्द नाही. पण आमच्यासारख्या गोरगरिबांना वा-यावर शासन सोडू शकत नाही.

तसेच रेवस-रेडी महामार्गाचे काम चालू आहे. ती भूसंपादन प्रक्रिया अजूनही चालू आहे. आम्ही पत्रव्यवहार करुन थकलो.

मी सामाजिक काम करतो. रोहा-आगरदांडा महामार्ग चालू आहे. तेथेही भूसंपादन कायदा, २०१३ च्या तरतुदी शासन पाळत नाही. तरी ही जनसुनावणी प्रथम रद्द करावी व शेतक-यांना न्याय द्यावा. अदानी कंपनीने १८ मार्च २०१० ला आगरदांडा ग्रामपंचायतीस एक वचननामा/affidavit दिलेले आहे. त्याची पूर्तता केली का?आज सोळा वर्षे झाली, त्याबाबत काहीच पूर्तता केलेली नाही. तसेच मुख्यमंत्री यांचा जो ग्रीन प्रोजेक्ट म्हणतात, तो रेवस-रेडी प्रकल्प आहे, शेतक-यांना अजूनही मोबदला मिळालेला नाही, मात्र ठेकेदारांना काम देऊन मोकळे झालेले आहेत. अजूनही भूसंपादनाची प्रक्रिया अजूनही पूर्ण झालेली नाही. आमच्या गरिबांना त्रास देऊन जर विकासाची कामे करत असाल, तर त्याचा आम्ही जाहिर निषेध करतो. तसेच रेवस-रेडी रेल्वेलाईन प्रकल्प त्वरित पूर्ण करण्यात यावा.

रेल्वेलाईनचा एक प्रकल्प आहे, त्यासाठी आगरदंडामध्ये एक अलाईनमेंट केली गेली. यात धार्मिक स्थळे, वाडी, नारळ-पोफळांची झाडी अधिग्रहित होणार आहेत. आमच्या ई-पेन्सिल नोंदी रद्द करण्यात याव्यात व प्रकल्प लवकर पूर्ण करण्यात यावा.

६) <u>श्री रमेश खारगावकर, राहणार-कुडगाव, तालुका-श्रीवर्धन,जिल्हा-रायगडः-</u>

प्रकल्पासाठी जो भराव टाकणार आहेत, तो किती टाकणार आहे? किती मीटर खाली भराव टाकणार? दोन्ही बाजूने किती कि.मी. भराव टाकणार?किती तिवरांची झाडे (mangroves) नष्ट होणार आहेत?किती खारफुटी नष्ट होणार आहे? माशांचे प्रजननाच्या जागा किती नष्ट होणार आहेत? किती मँग्रोस नष्ट होतील याबाबत काहीही माहिती अहवालात नाही. ड्रेजिंगमुळे माशांची प्रजजन जागा नष्ट होणार, त्यामुळे मासे नष्ट होणार, मॅग्रोस नष्ट झाल्याने येथील पाण्याच्या प्रवाहात,

पातळीत वाढ होणार आहे. त्यामुळे तेथील शेती ही नष्ट होणार आहे. खाडी आखुड झाल्याने येथील जैव-वैविधतेत परिणाम होणार आहे. या प्रकल्पामुळे कोळ्यांचे उदरनिर्वाहाचे साधन नष्ट होणार आहे. त्यामुळे आम्हांला गाव सोडून दुसरीकडे जावे लागणार आहे. आपले येथील अस्तित्व संपेल.

हा अदानी प्रकल्प ही स्लो पॉयझनिंग आहे. तरी हा प्रकल्प आम्हांला नको. आमचा जीव गेला तरी हा प्रकल्प होऊच देणार नाही. त्यांनी सर्व उपस्थितांना आवाहन केले की आपण सर्वजण प्रकल्पाच्या विरुध्द एकजुटीने लढणार आहात का? सर्वांनी एकमताने लढणार असल्याचे सांगितले. त्यांना सर्वांना आवाहन केले की आपले बोलणे थोडक्यात मांडा, तसेच लेखीस्वरुपात सूचना/आक्षेप नोंदविण्यात याव्यात.

७) <u>एडव्होकेट भालचंद्र नाग्या कांदेकर,राहणार-दिघी,तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगडः-</u>

आज श्रावणी सोमवार असून शंकराचा दिवस आहे. छत्रपती शिवाजीमहाराजांनी महादेवाच्या पिंडीसमोर जशी शपथ घेतली, तशीच आज आपण या प्रकल्पास पूर्णपणे विरोध करण्याची शपथ घेऊ या. येथे आलेल्या सर्व बंधु भगिनींचे आभार मानतो की आपण आपले रोजचे काम बाजुला ठेऊन न्याय हक्कासाठी एकत्र आलेले आहोत. आपण कायद्याचे पालन करणारे आहोत. आपण सर्वांना येथील शेतीची, व्यवसायाची व परिसराबाबत कळकळ असल्यानेच आपण सर्वजण व स्थानिक महिला बहुसंख्येने येथे उपस्थित आहेत.

मी दिघी कोळी आहे. या प्रकल्पास आमच्या सर्व दिघीकोळी समाजाचा विरोध आहे. कारण आमची खाडी जाणार आहे. कारण दिघी कोळी ही पारंपारिक मासेमारी करणारा कोळी समाज आहे. आमचा उदरनिर्वाह हा पूर्णपणे मासेमारीवर अवलंबून आहे. आमच्या स्थानिक बंधु-भगिनींनी आंदोलनासाठी सहकार्य करत आहेत. या प्रकल्पासाठी कराव्या लागणा-या ड्रेजिंगमुळे येथील मासेमारी नष्ट होईल. त्यामुळे या मासेमारी करणा-या कोळी समाजावर याचा मोठा गंभीरपरिणाम होणार आहे. त्यासाठी या प्रकल्पास विरोध करत आहोत.

बैठकीत एडव्होकेट मेंडाळकर, एडव्होकेट चिंतामण बडगुजी व एडव्होकेट कांदेकर यांनी व इतरांनी उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेपांना मी पाठिंबा देतो. त्यांनी जो विरोध नोंदविला, त्यास मी सहमती देतो.

आधि ही दिघी पोर्ट लिमिटेड कंपनी होती. नंतर ती अदानीने घेतली. मात्र दोन्ही कंपन्यांनी आमच्या स्थानिकांना काहीही सवलत दिलेली नाही. कोणतीही सामाजिक विकासाची योजना येथे राबविण्यात आलेली नाही. २००७ ला आंदोलन झाले, दिघी पोर्टसाठी ड्रेजिंग झाले, तेव्हापासून मासेमारी ही कमी झाली. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात सांगितले की प्रस्तावित प्रकल्पात ध्वनी प्रदूषण, पाणी प्रदूषण, हवा प्रदूषण होणार नाही. पण आमचा आक्षेप आहे की येथे ध्वनी प्रदूषण, पाणी प्रदूषण, हवा प्रदूषण, सागरी प्रदूषण होणार आहे.

या प्रकल्पाचा फायदा म्हणजे पायाभूत सुविधा व संपर्क सुविधा सांगण्यात आलेली आहे. तर अशी कोणती संपर्क सुविधा या प्रकल्पामुळे स्थानिकांना प्राप्त होणार आहे? तसेच येथील बाधित गावांतील ग्रामस्थांना प्रकल्पात नोकरीची संधि देण्यात आलेली नाही.

त्यांनी ईआय़ए अहवालातील काही पॅराज वाचून दाखविले. त्यांनी सांगितले की हा ईआयए अहवाल पूर्णपणे चुकीचा, प्रकल्पाच्या बाजूचा व दिशाभूल करणारा आहे. या चुकीच्या ईआयए अहवालामुळे बैठकीत खळबळ झालेली आहे. तरी या ईआयए अहवालाचा व जनसुनावणीचा येथील मी व शेतकरी निषेध करत आहेत.

८) **<u>श्री प्रविण तांडेल,रायगड जिल्हा कोळी समाज सचिव, अलिबाग, यांच्यामार्फत मी बोलत आहे.</u>**

जैतापूर अणु प्रकल्प हा रायगड जिल्ह्यात रासायनिक प्रकल्प होणार होता. तो रोह्यात प्रस्तापित करण्याचा घाट चालला होता. त्यावेळी रायगड जिल्हा कोळी समाजातर्फे विरोध करण्यात आला. थळ येथील शाहरुख खानचा बंगला पाडण्याचे काम सुप्रीम कोर्टात जाऊन आमच्या कोळी समाजाने केलेले आहे. या दिघी पोर्टच्याविरुध्द लेखी निवेदन सादर केलेले आहे. त्यातील प्रमुख मुद्दे -

<u>प्रकल्प रद्द करण्याची प्रमुख कारणे आहेत</u> -

अ) प्रकल्पाच्या ईआयए अहवालातच प्रस्तावित एस.पी.एम टँकर पारंपारिक बर्गच्या अगदी जवळ आणण्याऐवजी तो किना-यापासून दूरच थांबतो. विद्यमान मासेमारी क्षेत्रातच हा प्रकल्प होणार आहे.

आ) येथील मच्छिमारी नष्ट होईल. त्यामुळे कोळी समाज हा नष्ट होणार आहे. पारंपारिक मासेमारीवर परिणाम होणार आहे.

इ) या प्रकल्पासाठी भराव कायमस्वरुपी टाकून तो वापरला जाणार आहे. त्यामुळे तेथील जैवविविधता व माशांचे प्रजनन हे कायमचे नष्ट होणार आहे.

ई) मच्छिमाराच्या ज्या दहा हरकती आहेत, त्या लेखी स्वरुपात सादर करण्यात आलेल्या आहेत.

उ) आपण आदेश द्या - उरण श्रीवर्धन येथील सर्व ग्रामस्थांचे आंदोलन घेण्यात येईल.

९) <u>श्री इजाद हवालदार, राहणार-कुडगाव, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगडः-</u>

गट नं.५४,५५,५६,५७,५८,६१,६२,६३,६४ येथील १४४ एकर भूखंडात प्रकल्प स्थापित करण्यात आला. मात्र कोळी बांधवांचे म्हणणे आहे की १४४ एकरपेक्षा जास्त जमिन अदानीने अधिग्रहित केलेली आहे. त्याबाबत जिल्हा प्रशासनाने चौकशी का केली नाही.

दिनांक १७ जुलै, २०१० रोजी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी झालेल्या करारानुसार कुडगाव, हरवित आणि दिघी गावांसाठी ०.६ एमएलडी पाणीपुरवठा करण्यासाठी या सात कोटींच्या प्रस्तावास सुरवात झाली कुडकी धरणातून पाणी देण्यास सुरवात झाली. वडवलीपर्यत पाण्याची लाईन टाकण्यात आली. नंतर ती बंद झाली.

अदानीने कोर्टात शपथपत्रात सांगितलेले आहे की रस्ते, पाणी देण्यात येतील. कुडगाव, दिघी व हरवितला सोळा तास पाणी देईन. सोळा मिनिटेसुध्दा पाणी दिलेले नाही. एकवीस वर्षे होऊनही आम्हांला ज्या नागरी सुविधी पाहिजे, ती कोणतीही सुविधा देण्यात आलेली नाही. आमच्यावर अन्याय करण्यात आला. त्याचवेळेस दिघी, वडवली, कालसुरी गावांपर्यंत पाणी दिले. पण हरवित मुस्लिम गाव असल्याने पाणी दिले नाही. हा दुजाभाव आहे का या गोष्टींचा सर्वांनी

विचार करण्याची गोष्ट आहे. आमच्यावर अन्याय झालेला आहे. आम्ही समाजासोबत आहोत आणि शेवटपर्यत समाजासोबत राहणार आहोत.

१०) **<u>श्री विजय गिधी, राजापुरी,तालुका-मुरुड,जिल्हा-रायगडः-</u>**

माझ्या अगोदरच्या सर्व वक्त्यांनी बाधितांचे अनेक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यामुळे ते मी परत बोलत नाही. माझा एकच मुद्दा आहे - आम्हीसुध्दा प्रकल्पबाधित आहोत. तरीही येथे हॉस्पिटल उभारण्यात आलेले नाही. येथील हॉस्पिटल रोहयाला नेलेले आहे. तर रोहयाला हॉस्पिटल नेले, तर हा प्रकल्पसुध्दा रोहयालाच घेऊन जा.

मी १०-१५ पत्रे लिहिलेली आहेत. एकाचेही उत्तर अदानी व्यवस्थापनाने दिलेले नाही.

आता सांगतो दिघी पोर्टला - याद राखा - आमच्या परवानगीशिवाय प्रकल्पाचे कोणतेही काम सुरु करायचे नाही. आमचा दिघी पोर्टला संपूर्णपणे विरोध आहे.

येथे **<u>श्री प्रविण तांडेल,रायगड जिल्हा कोळी समाज सचिव, अलिबाग</u>** यांनी कंपनी प्रशासनास विनंती केली की लोक येऊन बराच वेळ झालेला आहे. कोणाला दुपारच्या गोळ्या घ्यायच्या असतील, तरी सर्वांना पिण्याचे पाणी देण्याची व्यवस्था करावी.

११) **<u>श्री देविदास चंद्रकांत कावळे, श्रीवर्धन पंचायत समिती, माजी सभापती, जिल्हा-रायगडः-</u>**

बैठकीत उपस्थित असलेल्या सर्व एडव्होकेट्सनी आमची बाजू चांगली मांडलेली आहे. तसेच इतर वक्त्यांनीसुध्दा प्रकल्पामुळे होणा-या त्रासाची माहिती दिलेली आहे.

आदित्या एन्व्हायरमेंटने अदानीचे जे रिपोर्ट दिलेले आहेत, ते सर्व खोटे व फसवे आहेत. त्यांना अहवालात ब्रेक वॉटर, ड्रेजिंगचे सांगितले आहे. त्यामुळे होणारे नुकसान दिलेले नाही.

प्रकल्पात जे ड्रेजिंग करावे लागणार आहे, त्याचे दुष्परिणाम (ill-effects) ईआयए अहवालात सांगण्यात आलेले नाहीत. तसेच वॉटर ब्रेकिंगसाठी जी भिंत

(वॉल) बांधण्यात येणार आहे. ती भिंत ओहोटीला डोळी लावणे व भरतीला डोळी लावणे त्या भागातच बांधणार आहेत. ब्रेकींग वॉलमुळे मच्छिमारी नष्ट होणार आहे. किना-याजवळ मिळणारी लहान मच्छी ही नष्ट होणार आहे. आमचा प्रकल्पास विरोध आहे. माझी व्यथा मी व्यक्त केली.

१२) **<u>श्री नाव कळवले नाही:-</u>**

जो ईआयए अहवाल तयार करण्यात आला, त्यात खोटारडेरपणा एवढा आहे की तेरा गावातील कोळी संघटनेतून ५-६ गावे ही वगळण्यात आलेली आहेत. त्यात मेंदडी, खरसई, खारगाव, पाबरा आणि वाशी यांचा समावेश होतो. कारण त्या भागात मँग्रोस भरपूर आहेत. त्यामुळे ते गाव वंचित ठेवणे हे शासनाचे धोरण आहे. कारण ही राजपुरी खाडी - हिचे नांव लक्ष्मी खाडी आहे. तेरा गावातील कोळीसमाज संघटना त्या खाडीशी निगडीत आहेत. त्या खाडीतील शिंपल्या, कालवे, खरब्या, चिंबोरी असतील, तर गावातील गरिब विधवा (Widow) महिला त्यावर उदरनिर्वाह करत असतात. प्रस्तावित अदानी प्रकल्पामुळे ऑईलचे तरंग खाडीवर बसेल. त्यामुळे त्यांच्या उपजिविकेचे साधन नष्ट होणार आहे.

तरी तेरा गावातील सर्व कोळी संघटनेतर्फे प्रस्तावित प्रकल्पास आमचा संपूर्ण गावांतर्फे पूर्ण विरोध आहे.

१३) **<u>श्री पांडुरंग पाटील, मांदाड तेरा गांव मुंबईकर मंडळ अध्यक्षः-</u>**

त्यांनी उपस्थितांना सर्वजण प्रस्तावित प्रकल्पास विरोध करणार आहात का असा प्रश्न विचारला. सर्वांनीच एक आवाजात सकारात्मक हो असे उत्तर दिले.

येथील वक्त्यांनी प्रकल्पाला विरोधाबाबतची कारणे सांगितली. त्यात मुंबई उच्च न्यायालयातील विधिज्ञ श्री आर. के. मेंदाडकरसाहेब यांनी उल्लेख केला की उच्च न्यायालयात जी पीआयएल नं. ४२/२००९ व्दारे आपल्या गावात पिण्याचे पाणी व पाणीपुरवठा यासाठी मागणी केलेली होती. उच्च न्यायालयाने आदेश देऊनही दिघी पोर्ट लिमिटेड साधी पिण्याचे पाणी व पाणी पुरवठा करु शकले नाहीत, त्यावेळेचे कलंत्री, नंतर दिघी पोर्ट व आताचे अदानी काय आपल्या मागण्या मान्य करणार? तसेच सर्व विधिज्ञांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची

चिरफाड केलेली आहे. प्रकल्पाचे दुःपरिणाम सर्वांना सांगितले, तर आम्हांला प्रकल्प नको.

सर्व जनता जागरुक झालेली आहे आणि ईआयए अहवालात दिशाभूल करणारी खोटी माहिती सांगत आहेत. एक कोटी खर्च आमच्या गावांमध्ये केला असे सांगतात, तो कुठे गेला? रुग्णवाहिका दिली सांगता, कुठे आहे रुग्णवाहिका?

तरी माझी विनंती सर्व ग्रामस्थ बंधुभगिनींना आहे की कोणीही या भूलथापांना बळी पडू नका.

आपल्या विधिज्ञ श्री चांदेकरसाहेब यांनी सांगितले की २०२२ साली सर्व जग कोविडमध्ये गेलेले होते. त्या कोविड काळात पर्यावरण सल्लागार यांनी ईआयए अहवाल तयार केला. ईआयए अहवाल हा कंपनीच्या बाजूचा आहे.

मी विधिज्ञांना विनंती करतो की उच्च न्यायालयाचे आदेश पाळत नाही, म्हणून त्यांनी या कंपनीच्या विरुध्द Contempt of Court ची याचिका दाखल करण्यात यावी.

त्यांनी सर्व उपस्थितांना आवाहन केले की या प्रकल्पास आपला विरोध आहे का? सर्वांनी सकारात्मक हो हे उत्तर दिले.

१४) <u>श्री रमेश लोणकर, राहणार--,तालुका--,जिल्हा-रायगडः-</u>

स्थानिक उपस्थितांनी पोटतिडकीने आपली व्यथा मांडलेली आहे. ही आमची खाडी आहे. आमची ही खाडी आहे आणि त्या खाडीमध्ये आम्ही डोली लावतो. आमचा मच्छीमारीचा व्यवसाय या प्रकल्पासाठी उध्वस्त करु नका. आमचा प्रकल्पास विरोध आहे.सर्व तेरा गावांचा विरोध आहे. विरोध म्हणजे विरोधच आहे.

१५) <u>श्री हरिदास गणपत पाटील, राहणार-दिघी कोळीवाडा गाव पाटील,तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगडः-</u>

दिघी बंदराच्या विस्तारासाठी प्रस्तावित मास्टर प्लॅन/आराखड्याचा विकास करण्यासाठी ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. सदरहू मास्टर प्लॅन हा विकासासाठी नसुन भकासासाठी आहे. याची कारणे मी थोडक्यात सांगतो-

अ) बंदर विकसित करताना भराव करावा लागणार आहे. त्यामुळे माशांचा नैसर्गिक अधिवास हा नष्ट होणार आहे,

आ) पारंपारिक मच्छिमारी करणारे कोळी,मच्छिमार हे देशोधडीला लागणार आहेत. कारण भराव टाकल्याने पारंपारिक मच्छिमारीच्या जागा या नष्ट होणार आहेत,

इ) ड्रेजिंग केल्याने समुद्रतळाची रचना बदलते. किना-याजवळील माशांचा नैसर्गिक अधिवास हा नष्ट होईल, त्यामुळे माश्यांचे उत्पादन प्रमाण कमी होईल. त्याचा परिणाम आमच्या मासेमारीवर होत असतो. अहवालात चुकीचा उल्लेख केलेला आहे की येथे फक्त खेकडेच मिळतात. येथे लहान-मोठी सर्व मासळी मिळत असते.

ई) ड्रेजिंगमुळे समुदाचा गाळ हलल्यामुळे माशांचे उत्पादन कमी होते. त्यामुळे प्रस्तावित प्रकल्पास आमचा विरोध आहे.

उ) लाईट हाऊस पासून दीड कि.मी. बर्थपर्यत एवढा भराव प्रस्तावित प्रकल्पात टाकणार आहेत. त्यामुळे भरती-ओहोटीला जो पाण्याचा करंट येतो, तो कमी होणार आहे. त्यामुळे आमची मासेमारी ही कमी होईल.

आमच्या सर्व वकिलांनी आमची बाजू चांगलीच मांडलेली आहे. त्यामुळे या प्रकल्पामुळे आमचा विकास होणार नसून, आम्ही भकास होणार आहोत. म्हणून या प्रकल्पास आम्ही विरोध करतो.

१६) <u>श्री लक्ष्मण मेंदाणकर, अध्यक्ष, एकवीरा मच्छिमार सहकारी संस्थाः-</u>

वास्तविक पहाता आता बोलायचे काहीही राहिलेले नाही. माझ्या अगोदरच्या सर्व वक्त्यांनी व विधिज्ञांनी प्रकल्पाच्या विरुध्द सर्व मुद्दे हे सांगितलेले आहेत. मात्र मी काही मुद्दे सांगत आहे, ज्या मूलभूत समस्या आहेत, ते सांगत आहेत. येथे सर्व नाखवा लोक, खलाशी, तसेच कोळी लोक आलेले आहेत.

फक्त सहा गावांनाच नोटीस आली, मात्र किनारपट्टीवरिल इतर गावांना का नोटीस आली नाही, याबाबत आम्हांला शंका उपस्थित झालेली आहे.

मी दोन मुद्द्यांवर बोलतो. निरिम जलाशयाचा विषय आहे. आता हवामानात बदल झालेला आहे. परदेशातून जी मोठी जहाजे येतील, ते बॅलन्स करण्यास पाणी

सोडतील, त्यातील घाण,सांडपाणी, तेल समुद्रात सोडण्यात येणार. त्यामुळे किनारा हा दुषित होणार आहे. त्यामुळे लहान मासे मरतात. किना-याजवळील मच्छि, लहान मासे हे नष्ट होणार आहेत. तसेच वातावरणात बदल झाल्यामुळे १००% मच्छिचे उत्पादन हे कमी होणार आहे.

तसेच प्रकल्पासाठी अतिरिक्त ५०.० एमएलडी पाण्याची गरज भागविण्यासाठी मोड्युलर डिसेलिनेशन प्रकल्प राबविण्यात येणार आहे. खा-या पाण्याचे रुपांतर गोडया पाण्यात करताना जे क्षार निर्माण होणार आहेत, ते परत खा-या पाण्यात सोडणार आहेत. त्यामुळे खा-या पाण्यातील समुद्राचा ऑक्सीजन हा नष्ट होणार आहे. किना-याजवळील मासेमारी ही नष्ट होणार आहे. आज सोमवार असून आमच्या कोळ्यांचा उपास असतो. तरी हे सर्वजण येथे उपाशी बसलेले आहेत. कारण त्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. ते सर्व प्रकल्पास विरोध करण्यास आलेले आहेत.

त्यांनी उपस्थितांना प्रकल्पास विरोध आहे काय याबाबत विचारणा केली असता सर्वांनी एकमताने होकार दिला.

१७) <u>श्री नरेश अपिने, राहणार-खामदे कोळीवाडा, तालुका---, जिल्हा–रायगडः-</u>

माझ्या समाजाचे आभार मानतो की त्यांनी मला बोलायची संधि दिली. येथे लोक बोलत आहेत. त्यांनी थोडक्यात बोलावे म्हणजे सर्वांना बोलता येईल. आमच्या समाजाचे तीन्ही वकिलांनी श्री मेंडाळकरसाहेब, श्री चिंतामणी बडगुजीसाहेब, श्री चांदेकरसाहेब, आमची बाजू चांगलीच मांडलेली आहे. आम्ही शेवटपर्यत लढणार आहोत. येथे महिला बहुसंख्येने उपस्थित आहेत. त्याही शेवटपर्यत लढणार आहेत.

आमचे हातावर पोट आहे. आमच्याकडे इंजिनची बोट नाही, तर ओलवाची बोट आहे. या प्रकल्पासाठी जी भिंत बांधणार आहे, त्यामुळे आमच्या मच्छिमारीवर परिणाम होणार आहे. आमचा प्रकल्पास पूर्ण विरोध आहे. हा प्रकल्प झाला, तर आमच्या लोकांना रस्त्यावर भीक मागावी लागेल. आम्ही शेवटपर्यत विरोध करणार आहोत.

१८) **श्री इक्बाल गजाली, राहणार-दिघी,तालुका-श्रीवर्धन,जिल्हा-रायगडः-**

येथे सर्वांनी विरोध विरोध जाहिर केलेला आहे. जेटीचा इतिहास सांगतो. १९७२ साली या जेटीचे भूमीपुजन झालेले आहे. नंतर ती जागा सिकॉमला देण्यात आलेली होती. २००६ ला कलंद्रीने घेतली. त्यांनी बेकायदेशीर उत्खनन केले. आता अदानी आले. नंतर या अदानी जेटीवर बोटावर मोजतील एवढीच माणसे व्यवसाय करत आहेत. मात्र आम्हांला सांगत होते की पन्नास हजार माणसे कामे करतील. आता भिंत बांधणार आहे, त्यामुळे मच्छिमारीवर परिणाम होणार आहे. फिल्टर पाण्यामुळे येथील पाणी खराब होणार आहे. येथील गोरगरिब कोळी,जनता यांच्यावर उपासमारीची पाळी येणार आहे.

तरी माझा व माझ्या परिवाराचा या प्रकल्पास पुर्ण विरोध आहे. तसेच माझा माझ्या कोळीसमाजास पूर्ण पाठिंबा राहिल.

१९) **श्री किरण कांदेकर, राहणार-दिघी कोळीवाडा, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगडः-**

या प्रकल्पास विरोध आहे. प्रकल्प अहवालात सांगण्यात आले की भरावामुळे येथील सागरी पर्यावरणावर परिणाम होऊन जीवनशैली नष्ट होणार आहे. मच्छी नष्ट होणार, तर आम्ही खाणार काय?

अहवालात नमुद केलेले आहे की आमच्या खाडीत झिंगाडा,नावसा, तर समुद्रात घोळ मासा मिळतो. अहवालात त्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. ते का केले नाही याचे स्पष्टीकरण देण्यात यावे. शिवाय अहवालात ड्रेजिंगचा उल्लेख आहे. जर ड्रेजिंग ३६० मीटरमध्ये आजूबाजूच्या बोटी जाणार कशा? येथील जैवविविधता नष्ट होणार आहे. पावसाळ्यात मच्छिमारी बंद ठेवतात. शासनसुध्दा तीन महिने मच्छिमारी बंद करते, कारण मच्छिचे प्रजनन होण्यासाठी.

शासन तीन महिने मच्छिमारी बंद करते, कारण माशांचे प्रजनन झाले पाहिजे. मात्र या प्रकल्पामुळे मोठ्या बोटी, जहाजे येऊन येथील माश्यांचे प्रजनन नष्ट होणार आहे. त्यामुळे माश्यांचे प्रमाण नष्ट होणार आहे. तरी याची नोंद घ्यावी.

आमचा प्रकल्पास विरोध आहे.

२०) **अलका मुनार, सामाजिक कार्यकर्ती, राजपुरी कोळीवाडा, जिल्हा-रायगडः-**

आमचे वडिल मासेमारी करत असताना राजपुरी खाडीत बरिच मच्छी मिळायची. आता खाडीची मच्छि संपुष्टात आलेली आहे.

आता समुद किना-यावर जी मच्छि मिळते, ती या प्रकल्पामुळे नष्ट होणार आहे. म्हणजे गाळ काढल्याने, जहाजांच्या वाहतुकीमुळे मच्छिवर परिणाम होत आहे. म्हणजे आमचा मासेमारी व्यवसाय नष्ट होणार, म्हणून त्या बदल्यात ते सीएसआर निधी आमच्या गावात देणार आहेत. ते आम्हांला मान्य नाही. सीएसआर फंड हे काही आमच्या उपजिविकेचे साधन नाही. समुद्र आहे आमचा, नाही कुणाच्या बापाचा. राजपुरी खाडी आमची आहे. ती आम्हांलाच मिळाली पाहिजे. आम्हांला हा प्रकल्प मान्य नाही. अदानी प्रकल्पास आमचा पूर्ण विरोध आहे.

२१) **श्री आनंद लोखंडे, उपसरपंच, मांदाड ग्रामपंचायत,जिल्हा-रायगडः-**

येथे बहुसंख्येने नारीशक्ती उपस्थित आहे. त्यांचे अभिनंदन. जर नारीशक्तीचा उद्रेक झाला, तर अदानीचे साम्राज्य नष्ट होण्यास काहीही वेळ लागणार नाही. मी जातीने बौध्द असलो तरी व्यवसायाने आम्ही कोळी आहोत. येथील सर्व कोळीबांधव आपला उदरनिर्वाह मच्छिमारीवर करत असतात. मी शाळेतून आलो की शेजारील मांदड खाडीतून खेकडे काढत असे. आम्ही सर्व कोळीबांधव या प्रकल्पाच्या विरोधासाठी आलेलो आहोत. हा आमच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे.

उपसरपंच म्हणून जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की जो इंदापूर-आगरदांडा रस्ता झालेला आहे, त्यात मांदड ते खाजणीचा पूल असेल, ब-याच वर्षे तो रस्ता रखडलेला आहे. तिथे अपघात होऊ शकतात. मागच्या वेळेस शाळेची बस उलटी झालेली होती. तरी आपण लक्ष घालावे.

आमचा या प्रकल्पास पुर्ण विरोध आहे. जय कोळीसमाज.

२२) **श्री उमेश हरिचंद्र करंजे, राहणार-मांदाड गाव,तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगड**

येथे उपस्थितांनी व कायदेपंडितांनी सर्व बाजू मांडलेली आहे. आता मांडण्यासारखे काही राहिलेले नाही. मी मांदाड गावचा रहिवाशी असून आमच्या मांदाड गावात खाडी आहे. आमचा गांव मच्छीमारांचा आहे. आम्ही भातशेती करुन, मच्छिमारी करुन पोट भरणारे आहोत. या प्रकल्पामुळे आमची मच्छिमारी नष्ट होणार आहे. मी कुणबी समाजाचा असलो तरी माझा व्यवसाय हा मच्छिमारी आहे. त्यामुळे हा प्रकल्प आम्हांला नको. मागील एका सर्वेक्षणात येथे मच्छिमार समाज नाही असा चुकीचा निष्कर्ष काढण्यात आलेला होता. हा आमचा कुणबी, कोळी समाजाचा एकत्रित लढा आहे. आम्ही खांद्याला खांदा लावून या प्रकल्पाच्या विरुध्द लढणार आहोत.

दुसरा मुद्दा तुम्ही कोठले प्रशिक्षण देणार आहात, आतापर्यंत दिलेले नाही. प्रकल्पाचे अधिकारी हे आमिष दाखवत आहेत.

अदानी प्रकल्प किना-यावरील आमची जमिन लाटण्याचा प्रयत्न करत आहे. आम्ही सर्व कुणबी समाज व कोळी समाज एकत्र लढणार आहोत. तसेच माझा मुद्दा सर्वेक्षणात मांदाड गावात मच्छिमार समाज नाही असा चुकीचा निष्कर्ष काढण्यात आलेला होता याचीसुध्दा नोंद घेण्यात यावी.

२३) **श्री जगन्नाथ गोविंद खारगावकर, अखंड कुडगाव कोळीसमाज माजी अध्यक्ष,विद्यमान सदस्य, कुडगाव ग्रामपंचायतः-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले आहे की शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार आपण शिकलो, संघटीत झालो आणि हा संघर्ष करत आहोत.

या पोर्ट प्रकल्पासाठी २००५ ला एन.ओ.सी. देण्यात आली, त्यावेळी हरवित, कुडगाव या गावांचा समावेश करण्यात आला. इतर गावे - दिघी, नानवली, करलास व इतर गावांना पाणी मिळते, पण कुडगाव, हरवितला पाणी मिळत नाही. आपण सर्वांनी मिळून लढा द्यायचा आहे. आमच्या समाजाने

हा लढा उभा केलेला आहे, त्याला माझा पाठिंबा आहे. या विनाशकारी प्रकल्पास आमचा पूर्ण विरोध आहे.

२४) <u>श्री राजेन्द्र घोसाळकर, सरपंच, काळसुरी ग्रामपंचायत, तालुका-म्हसाळा, जिल्हा-रायगडः-</u>

आपण जी ग्रामपंचायतीस दिघीपोर्ट बाबत नोटीस/पत्र पाठविले, त्याची माहिती पाहिजे. येथे काळसुरी गावात येथे मच्छिमार आहेत, खाडीपट्टा आहे, तसेच शेतजमिन खूप आहे. त्यात जनावरे, पशूपक्षी आहेत. त्यांचा -हास होऊ नये.

मी काळसुरी गावाचा सरंपच म्हणून आवाहन करतो की जे तेरा गावातील कोळी बांधव विरोध करत आहेत, जर हा प्रकल्प विनाशकारी आहे, तर स्थानिक लोक जो विरोध करत आहेत, त्यास काळसुरी गावसुध्दा पाठिंबा देत आहे हे मी जाहिरपणे सांगतो.

२५) <u>श्री द्वारकानाथ धर्मा पाटील, माजी अध्यक्ष,खारगाव कोळीसमाज व तेरा गाव कोळी समाज सल्लागारः-</u>

येथे उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी जे आक्षेप नोंदविला त्या सागरपुत्र व सागरकन्या यांचे आभारी व ऋणी आहोत. ही दिघी खाडी दिघी ते म्हसळा टोकापर्यंत आहे. ही खाडी आमची आई आहे. समुद्र हा कोळ्यांचा बाप, तर खाडी ही आई आहे. जेटीसाठी ड्रेजिंग करावे लागेल, त्यामुळे संपुर्ण मच्छिचा -हास होईल. मँग्रोसच्या बुडाला मच्छि प्रजनन करण्यास जाते. जर माश्यांचे प्रजनन झालेच नाही, तर माशांची उत्पत्ती होणारच नाही. त्यामुळे आमच्या तेरा गावातील संपूर्ण कोळी समाजाचा या प्रकल्पास तीव्र विरोध आहे. प्रसंगी आम्ही प्राणाची आहुती देऊ, पण हा प्रकल्प होऊ देणार नाही.

२६) <u>श्री गणेश मुन्नक, राहणार-राजपुरी, तालुका-मुरुड, जिल्हा-रायगडः-</u>

महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजीमहाराज व आई एकविरादेवीस वंदन करुन दोन शब्द बोलतो. आतापर्यत कोळी समाजावर फक्त आणि फक्त अन्याय केलेला आहे. प्रत्येकवेळी प्रकल्प अधिकारी यांनी आमिष दाखविलेले आहे.

कंपनीने व प्रत्येक सरकारने कोळी समाजावरच अन्याय केलेला आहे. कोळी समाज हा शांत आहे. पण पेटला की पूर्णपणे पेटून निघतो याची नोंद घेण्यात यावी.

२७) **<u>श्री शशिकांत रमेश बेडेकर, मुक्काम पोस्ट-दिघी, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगडः-</u>**

आपल्या वकिलांनी सर्व मुद्दे मांडलेले आहेत. त्यात मला विचारायचे आहे की अहवालात उल्लेख केल्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांनी शिक्षणावर २०२४-२५ साली ३२.६० लाख खर्च केलेला आहे, तसेच सामुदायिक आरोग्यावर १३९.७९ लाख खर्च करण्यात आलेला आहे. त्याबाबत खर्च कुठे व कसा केला याबाबत माहितीची एक प्रत त्वरित उपलब्ध करुन देण्यात यावी. हा खर्च कुठे केला किंवा कोणाच्या घश्यात गेला हे कळलेच पाहिजे.

तसेच पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाचे सर्वेक्षण हे २-३ वर्षे अगोदरच केलेला असेल. मात्र अहवालावर लिहिलेले आहे एप्रिल, २०२६. त्यांनी सांगितले की येथील लोकसंख्या ३,५००. मात्र जनगणना धरलेली आहे २०११ ची. म्हणजे ईआयए अहवालातील सर्व माहिती/डेटा हा चुकीचा आहे.

अहवालात असे लिहिलेले आहे की पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्प परिघात जो सामाजिक-आर्थिक अभ्यास केला, त्यात स्थलांतराच्या प्रवृत्तीमुळे बाळ लोकसंख्येत (०-६ वर्षे) लक्षणीय घट दिसून येते. ती २४.१४% दाखविली. पण स्थलांतर हे शिक्षणासाठीसुध्दा असू शकते. जर बाळ लोकसंख्येत (०-६ वर्षे) लक्षणीय घट दिसून येते. ती २४.१४% दाखविली, तर एवढा मोठा समाज येथे टिकला असता का व येथे सर्व मंडप भरला गेला असता का? दिलेला डेटा हा पूर्णपणे चुकीचा असून आश्वासने ही चुकीची देत आहेत.

प्रस्तावित प्रकल्पास आमचा जाहिर विरोध आहे.

२८) **<u>सौ. वासंती मंगेश गुणाजी, सदस्य, जिल्हा परिषद-रायगडः-</u>**

सदस्य, जिल्हा परिषद-रायगड म्हणून माझा या प्रकल्पास विरोध, विरोध आणि विरोध. येथे महिलांनी लक्षणीय उपस्थिती दाखविलेली आहे, म्हणून मी तुमची आभारी आहे. तुम्हाला कोणाला बोलायचे असल्यास त्यांनी येथे येऊन

बोलावे. हा तुमचा हक्क आहे. येथे आलेल्या महिलांना आवाहन करते की आपण या आणि येथे दोन शब्द बोला.

२९) **सौ. मुक्ता मधुकर खोपटकरः-**

मी सर्वसामान्य स्त्री व सर्वसामान्य नागरिक म्हणून बोलत आहे. प्रस्तावित अदानी प्रकल्प म्हणजे केसाने गळा कापल्यासारखाच झालेला आहे. आमचा या प्रकल्पाला जाहिर निषेध आहे. आमच्या कोळी बांधवांचा नाश करणारा प्रकल्प आहे. प्रकल्पास आमचा विरोध आहे. कोळी बांधवांचा धिक्कार केला जातो, कोळी बांधवांची कोणालाही आठवण रहात नाही.

३०) **श्री चंद्रकांत चव्हाण, राहणार-राजपुरी,तालुका-मुरुड,जिल्हा-रायगडः-**

राजपुरी गावाचा कार्यकर्ता असून तेरा गावांचा प्रतिनिधी आहे. मी माझी व्यथा सांगत आहे. दिघी गावात जो प्रकल्प उभा राहिला, त्यामुळे रात्री तेथे जहाजे येऊन खाडीत दलदल वाढली, त्यामुळे खाडीतील मच्छी ही संपुष्टात आलेली आहे. आम्ही पिढ्यानपिढ्या या खाडीवर उदरनिर्वाह करत आहोत.

येथे ड्रेजिंग करुन खाडी नष्ट करण्याची आणि या प्रकल्पाने कोळी बांधव नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात येत असेल, तसेच आपल्या छत्रपती संभाजी महाराजांची आठवण असणारा मुरुड येथील जंजिरा किल्ला नष्ट करण्याचा प्रयत्न केल्यास त्यास आम्ही तीव्र विरोध करणार.

३१) **सौ. यमुना किशोर मेंदाडकर, राहणार-दिघी, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगडः-**

आम्ही दिघी गावचे कोळी लोक आहोत. आम्हांला पुरेसे पाणी मिळत नाही. आम्हांला सांगितले होते की रोज शंभर टँकर्स येतील, तर दहासुध्दा टँकर्स येत नाहीत. पाण्यासाठी वणवण करावी लागते. आम्ही सगळे भाऊ बहिणी एक होऊन लढत आहोत. येथे प्रकल्प येता काम नये. त्यामुळे आमच्या धंद्यावर परिणाम होतो.

३२) **सौ. निर्मला जयपाल कांदेकर, ग्रुप ग्रामपंचायत सदस्य, दिघी,तालुका- श्रीवर्धन,जिल्हा-रायगडः-**

चर्चेत सांगितल्याप्रमाणे फक्त घंटागाडीवरच फोकस आहे. मगाशी सादरीकरणात फोटो दाखविले. तर मराठी शाळेत फक्त एक वर्ग बोलका वर्ग करण्यासाठी एक भिंत रंगविली आहे. बाकीचे नऊ वर्ग हे तसेच ठेवलेले आहेत. फक्त घंटागाडी दिली. त्याचे भाडे ग्रामपंचायतीस द्यावे लागते.

आमचा या प्रकल्पास त्रिवार विरोध आहे.

३३) **श्री प्रकाश महादेव गोवारी, राहणार-दिघी कोळीवाडा, तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगडः-**

प्रकल्प सल्लागार आदित्य एन्व्हॉयरमेंट, मुंबई यांनी जो पर्यावरण प्रभाव मुल्यांकन (ईआयए) अहवाल सादर केलेला आहे, तर येथील एकाही व्यक्तीस माहित नाही की त्यांनी प्रकल्प परिसरात सर्वेक्षण कधि केले?

प्रकल्प सल्लागार आदित्य एन्व्हॉयरमेंट, मुंबई यांनी ग्रुप ग्रामपंचायत दिघीमध्ये २०२२ साली मिटिंग लावलेली होती. त्यावेळी ग्रुप ग्रामपंचायत दिघी यांनी सरळसरळ नकार दिला.

तरीसुध्दा ग्रुप ग्रामपंचायत दिघीला विश्वासात न घेता किंवा दिघीमधील स्वायत्त संस्था यात तेरा गावात मच्छिमार सोसायट्या आहेत, त्यांना विश्वासात न घेता हा जो पर्यावरण प्रभाव मुल्यांकन (ईआयए) अहवाल तयार केला. त्यांनी प्रकल्प परिसरात केव्हा सर्वेक्षण केले ते माहित नाही, त्यांनी कार्यालयात ए.सी. मध्ये बसून तयार केलेला आहे. हा अहवाल चुकीचा व स्थानिकांची दिशाभूल करणारा आहे. अहवालात भरपूर विसंगती असून तो कंपनीच्या बाजूने केलेला आहे.

अहवालात प्रकल्प स्थानापासून नजिकचे विमानतळ छत्रपती शिवाजीमहाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ अंतर दाखविलेले आहे ९०.० कि.मी. मोबाईल अंतर पाहिले तर ते येते १६७.० कि.मी.

तर प्रकल्पाच्या जवळील पुरातत्वीय स्थळ मुरुड येथील जंजिरा किल्ला हा ०.१६ कि.मी. अंतरावर आहे. त्यासाठी पुरातत्वीय विभागाची पूर्व परवानगी घेण्यात आलेली नाही.

तसेच बंदर (पोर्ट) तयार झाल्यानंतर येणा-या जहाजांमुळे जो कचरा होईल, तो कुठे टाकायचा. त्यावर शास्त्रीयदृष्ट्या विल्हेवाट याबाबत स्पष्टीकरण दिलेले नाही. हा अहवाल चुकीचा असल्याने त्यावर लावलेली जनसुनावणी ही चुकीची आहे. दिघी पोर्टमधील कच-याची विल्हेवाट ही दिघी पोर्टने लावणे अपेक्षित आहे. मात्र ग्रामपंचायतीची घंटागाडी कचरा नेते. याचा अर्थ पोर्टने कच-याची विल्हेवाट यंत्रणा उभारणी केलेली नाही.

तरी या प्रकल्पास पूर्ण विरोध आणि विरोधच आहे.

३४) <u>श्री बाळकृष्ण तुरुंबाडकर, अखंड कुडगाव कोळी समाज, मुंबई अध्यक्ष आणि तेरा गाव कोळी समाज,मुंबई सचिव</u>

ज्या पध्दतीने समुद्र आपला तारकपणा सोडत नाही, त्या पध्दतीने कोळी समाज आपला एकपणा सोडत नाही. या प्रकल्पाविरुध्द प्रशासकीय, सामाजिक वा न्यायालयीन लढा द्यायचा, यासाठी आमचे कोळी बांधव सक्षम आहेत. ही एकजूट आपल्याला कायमची ठेवायची आहे. त्यांनी त्यांचे लेखी निवेदन वाचून दाखविले. त्यांनी आक्षेप नोंदविला की पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआय़ए) अहवाल हा स्थानिकांसाठी स्थानिक भाषा मराठीत उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही.

या प्रकल्पाच्या ड्रेजिंगमुळे येथील माशांचा नैसर्गिक अधिवास हा नष्ट होणार आहे. त्यामुळे मच्छी संपेल. लेखी निवेदन सादर करण्यात आले. त्यात विविध मुद्दे दिलेले आहेत. दिघी आगारदंडा यातील अंतर हे चुकीचे वाटते, ते योग्यप्रकारे घेण्यात आलेले नाही. जर प्रकल्प आला, तर आपली खरब, पालक आपल्याला मिळणारच नाही.

३५) <u>श्री कुमार विपुल रमेश गोरवले, सरपंच तथा प्रशासक, ग्रुप ग्रामपंचायत दिघीः-</u>

सर्वांनीच आपला विरोध दर्शविलेला आहे. समुद्र ही आपली शेती आहे. शेतीवर कंपनी जेसीबी चालवणार असेल तर शेती कोणी हिसकावून घेणार असेल किंवा

आपली शेती खराब करेल तर आपण सहन करणार का? सर्व उपस्थितांनी एकमताने नाही सांगतिले.

ग्रुप ग्रामपंचायत सरपंच या नात्याने प्रकल्पास विरोध असल्याचे सांगितले. आपण सर्व तेरा गाव कोळी समाजाच्या पाठीशी आहे. सरपंच या नात्यानेही या प्रकल्पा विरोध आणि विरोधच आहे.

३६) <u>श्री निकेश चंद्रकांत तांडेल, नाणवली गावचा नवनिर्वाचित कार्यकर्ताः-</u>

पर्यावरण सल्लागार आदित्य एन्व्हायरमेंट, मुंबई यांनी अहवालात लिहिलेले आहे की येथे फक्त चिंबोरीच मिळते. त्यांनी समुदायाला प्रश्न विचारला की हे खरे आहे काय?सर्वांनी एकमताने नाही सांगितले. चिंबोरी बरोबर बोंबिल व इतर मासे कोठे गेले असे त्यांनी विचारले.

तसेच अजुनपर्यत पोर्ट का बनले नाही? तसेच ईआयए अहवाल हा स्थानिकांच्या माहितीसाठी मराठी भाषेत का उपलब्ध करण्यात आला नाही?

तसेच प्रकल्पाचे सादरीकरण जे दाखविले, ते स्थानिकांना समजलेले नाही. फक्त आकडेवारी दिसली. लोकांनी विचारणा केली असता पोलिस त्यांना गप्प बसा म्हणून सांगत होते.

या प्रकल्पास नाणवली गावाचा संपूर्ण विरोध आहे.

३७) <u>श्री गोविंद गुणाजीः-</u>

जे ड्रेजिंग करण्यात येणार आहे, ते सुमारे ६० दशलक्ष घनमीटर एवढे करणार आहेत. गाळ काढण्यास सुमारे पावणेपाच वर्षे लागतील. तर तो गाळ कुठे टाकण्यात येणार आहे? जर पावणेपाच वर्षे लागणार असतील, तर तेथे मासेमारी करायची का नाही?

दुसरी गोष्ट दरवर्षी १४ दशलक्ष घनमीटर गाळ ते देखभाल करण्यासाठी (maintenance) काढणार आहेत. म्हणजे लोकांनी मच्छिमारी करावयाचीच नाही असे अदानी कंपनीचे म्हणणे आहे काय?

माझा या प्रकल्पास विरोध आहे, विरोध आहे.

३८) **श्री जनार्दन पांडुरंग बसमत,चारगाव कोळी समाज सचिव, माजी सरपंच व विद्यामान संरपंचांचे पतीः-**

ही जनसुनावणीची तारीख प्रसिध्द झाल्यानंतर या प्रकल्पासाठी ग्रामसभेत सभा झाली. त्यावेळी ग्रामसभेत सर्व समाजाने प्रस्तावित प्रकल्पासाठी विरोध दर्शविण्यात आलेला आहे. तसेच माझ्या गावातील ग्रामपंचायती असतील, म्हणजे निगडी, खारगाव, देवघर असतील, त्यांनीसुध्दा विरोध केलेला आहे. या प्रकल्पामुळे मासेमारी ही नष्ट होईस. फक्त कोळीच नाही, तर मच्छिमारीत कोळी समाजावर अवलंबून असणारे समाजातील इतर घटक, तसेच समाजातील सर्व बंधुदेखील मासे खरेदी करतात व ते विकतात. त्यांचा उदरनिर्वाह त्यावर चालतो. त्यांवर संकट येईल. अन्न,वस्त्र व निवारा हा शासनाने पुरवायचा आहे. तो आपण ग्रामपंचायतीमार्फत पुरवू, अदानीची काहीही गरज नाही. .

या प्रकल्पास विरोध आणि फक्त विरोध आहे.

३९) **करसई कोळी समाज अध्यक्ष भांजी नांगेगुणे,**

मी संपूर्णपणे तेरा गावच्या संघटनेबरोबर आहे. तरी माझ्या करसई गावातर्फे प्रकल्पास संपूर्ण विरोधच आहे.

४०) **श्री. नाव कळवले नाही:-**

सर्व प्रथम माझ्या बांधवांना नमस्कार. भांडवलदारांच्या स्वार्थासाठी जर का आमची वडिलोपार्जित पारंपारिक खाडी जर का उध्वस्त करत असतील, आमच्या गावावर कबजा करत असतील, व आपल्यावर सरळसरळ अन्याय करत असतील, तर धिक्कार आहे. सर्वांच्यात राम आहे, राम गेला की सर्वकाही गेले. आमचे तेरा गाव संघटनेतर्फे प्रस्तावित प्रकल्पास विरोध आणि विरोध आहे.

४१) **श्री अनंत जगन्नाथ पाटील, राहणार-दिघी कोळीवाडा,तालुका-श्रीवर्धन,जिल्हा-रायगडः-**

अ) शासकीय प्रशासन कोळी समाजावर कसा अन्याय करते याचे उदाहरण म्हणजे जंजिर किल्ल्याजवळ ब्रेक वॉटर बांधलेले आहे. तो इतक्या मोठ्या प्रमाणात बांधलेला आहे की तर तेथे बोट किंवा लॉन्च लावायची असेल तर

त्यासाठी १२५ मीटर ब्रेक वॉटर बांधलेला आहे. त्यामुळे तेथील मच्छीमारांचे नुकसान होत आहे. याची दखल घेण्यात यावी.

आ) तेरा गाव कोळी समाज या खाडीत मासेमारी करतात. प्रत्येकाची हद्द बांधून घेतलेली आहे. जर तेथे ब्रेक वॉटर बांधला, तर तेरा गावातील कोळी मासेमारीपासून वंचित राहतील.

इ) दिघी पोर्ट हा मर्यादित होता, तो आता राष्ट्रीय स्तरावर जाईल. पूर्वी या स्थानासाठी जनसुनावणी झालेली आहे. व्हेरिटॉस कंपनीची जनसुनावणी झालेली आहे. त्या कंपनीचे घातक पदार्थ अजूनही तेथे आहेत. या प्रकल्पामुळे आमची खाडी बरबाद होऊ शकते.

ई) पूर्वीच्या प्रकल्पास कुलुप लावण्यात आलेले होते. तसेच या प्रकल्पासही करण्यात येईल. तसेच मोठ्या जहाजांमुळे किना-याजवळील माशांचा नैसर्गिक अधिवास हा नष्ट होणार आहे. त्यामुळे माशांची उत्पत्ती कमी प्रमाणात होईल. या तेरा गावातील सर्व कोळी येथे मासेमारी करतात. त्यांच्या उदरनिर्वाहावर परिणाम होणार आहे.

तरी तेरा गावातर्फे या विनाशकारी प्रकल्पास विरोध आहे.

४२) <u>श्री जगन्नाथ मल्लारी वाघरे, अध्यक्ष, माहेश्वरी सोसायटी, उपसरपंच, एकदरा ग्रामपंचायत,जिल्हा-रायगडः-</u>

आम्ही अदानीला सांगतो, तुम्ही ड्रेजिंग काम सुरु केल्यास तुमच्या समोर आडव्या बोटी टाकल्या नाही तर बघा. जेथे भराव टाकायचा आहे, तेथेपण आम्ही एकत्र येऊन भराव टाकू देणार नाही.

एकदरा गावाचा प्रकल्पास विरोध.

४३) <u>श्री अनंत रखमा पाटील, तुरुंगीवाडी गावचा अध्यक्ष, तेरा गाव कोळी संघटनेचा सचिव-</u>

राजपुरी खाडी ही शिवकालीन असणारी पवित्र खाडी आहे. या खाडीवर कोणीही अतिक्रमण केलेले नाही. मात्र २००७ पासून या खाडीस कलंक लागलेला आहे.

या राजपुरी खाडीवर येथील सर्व कोळी समाजाचे पोट आहे. तसेच इतरही समाजाचे पोट आहे. येथील तेरा गावे पोट भरतात. आमच्याकडे जमीनजुमला नाही, पण आमचा सातबारा म्हणजे आमची खाडी आहे.

तरी प्रस्तावित प्रकल्पास माझ्या तुरुंगीवाडी गावाच्या वतीने व सर्व तेरा गाव कोळी समाज संघटनेच्या वतीने अदानी प्रकल्पास विरोध आहे.

४४) <u>श्री गोपाळ महादेव मेंदाडकर प्रशासक, उपसरपंच, ग्रामपंचायत दिघीः-</u>

माझ्या अगोदर माझ्या गावातील लोकांनी प्रकल्पास विरोध दर्शविलाच आहे. आमच्या इलेक्ट्रीक हाऊसच्या येथे १६०० मीटर ब्रेकवॉटर वॉल बांधणार आहेत. आमच्या कोळ्यांची उपजिविका ही भरती ओहोटीवर असते. तो करंट कमी होणार आहे. मच्छी खूपच कमी प्रमाणात मिळेल. ब्रेकवॉटर वॉलमुळे माशांचा नैसर्गिक अधिवास हा नष्ट होणार आहे. या प्रकल्पामुळे मच्छी नष्ट होणार आहे. कोळ्यांवर उपासमारीची पाळी येईल.

प्रकल्पास पूर्ण विरोध आहे.

४५) <u>श्री जगन्नाथ ज्ञानदेव तांडेल, माजी सरपंच, वाशीवली, अध्यक्ष, वाशीवली कोळी समाजः-</u>

आमच्या विधिज्ञांनी आमची बाजू चांगली मांडली. परंतु एक युवक म्हणून काही विचार मांडत आहेत -

मीही मासेमारी करणार युवक आहे. खेकडा, शिंपले यांच्याबरोबरच कालवा, पिलवा सुध्दा भरपूर प्रमाणात मिळते. माश्यांच्या अनेक जाती या समुद्रात मिळत आहेत.

आमच्या गावातील एकही युवक हा नोकरीस न जाता मासेमारी करत असतो. आम्हांला अदानी, अंबानींची गरज नाही.

प्रकल्पास विरोध आहे.

४६) **श्री-नाव कळवले नाही:-**

२००३-२००४ मध्ये दिघी पोर्टसाठी निरीकडून रॅपिड ईआयए तयार करण्यात आलेला होता. २००५ मध्ये त्यांना पर्यावरण अनुमती प्राप्त झालेली होती. तसाच अहवाल २०२२ मध्ये आदित्य एन्व्हार्मेंटलने दिला. वीस वर्षाच्या कालावधीत बरीच तफावत झालेली आहे. त्यात मच्छिमारांचे आर्थिक खूपच नुकसान झालेले आहे. तरी माझी हरकत नोंदविण्यात यावी.

या प्रकल्पास राजपुरी खाडीच्या कोळी समाजाचा विरोध आहे.

४७) **श्री. सदस्य, रायगड जिल्हा परिषद, अध्यक्ष, चारगाव संघटना, उपाध्यक्ष, तेरा गाव कोळी संघटनाः-**

आज नागपंचमी असूनही प्रकल्पास विरोध करण्यासाठी आलेल्या सर्व ग्रामस्थांमध्ये महिलांची उपस्थिती ही लक्षणीय आहे. आम्हांला १३ गावातील सर्व ग्रामस्थांचा पाठिंबा मिळालेला आहे.

या जनसुनावणीस व प्रस्तावित प्रकल्पास आमच्या तेरा गावांचा विरोध आहे. कोळी समाजाबरोबर इतर समाजही आमच्या बरोबर आहे. कारण इतर समाजाची शेतीसुध्दा जाणार आहे. पोलिस प्रशानाचे आभार त्यांनी सहकार्य केल्याबद्दल.

४८) **श्री गोपीनाथ घनश्याम चव्हाण, मुक्काम तुरंगावाडी, तेरा गाव कोळी संघटना सहसदस्यः-**

या जनसुनावणीच्या माध्यमातून मी तेरा कोळी संघटनेच्या गावातील पदाधिका-यांना विनंती करतो की सर्वांनी संघटीत राहावे, एकत्रित करणे गरजेचे आहे. अदानी आमिष दाखवतील, त्यास बळी पडू नका.

प्रकल्पास विरोध.

४९) **श्री अनंत सी. मेंदाडकर, राहणार-दिघी,तालुका-श्रीवर्धन,जिल्हा-रायगडः-**

या जनसुनावणी असे दिसून आले की येथील प्रकल्पबाधित गावांमधील सर्व ग्रामस्थांचा या प्रकल्पास विरोध आहे.

हा विरोध करत आहोत - कारण आमची फसवणूक होत आहे, आमचे जे नुकसान होणार आहे, आमची उपासमारीची पाळी येणार आहे. ही तेरा गावे या खाडीवर पोट भरतात.

आम्ही दरवर्षी मच्छिमारी करण्यासाठी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डला खुटवा भरतो. प्रत्येक गावाला वाटप केलेली खाडी आहे. १७०० मीटर खाडीचे अंतर दिघी ते आगरदांडा ७०० मीटर खाडी बुजविली गेली. आता दोन्ही बाजूस भराव टाकणार आहेत. तर १००० मीटरमध्ये काय शिल्लक राहिल.

बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचनेनुसार निरिम जल बॅलन्स करण्यासाठी सोडण्यात येते, त्यामुळे तेथील जलचर हे मरणार आहेत. मासेमारी करताना मच्छिमारांच्या पध्दती आहेत, त्यांचा येथे अभ्यास करण्यात आलेला नाही. फलटी, मेंढीचा कुठेही उल्लेख नाही. रापणीचा उल्लेख नाही. येथे प्रकल्प बाधित असताना रोहयाला हॉस्पिटल का, येथे का नाही.

प्रकल्पास पूर्ण विरोध.

५०) **<u>श्री जनार्दन गोवारी, राहणार-दिघी,तालुका-श्रीवर्धन, जिल्हा-रायगड-</u>**

प्रस्तावित प्रकल्पाची जनसुनावणी चालू आहे. येथे २,५०० खुर्च्या ठेवल्या होत्या, पण आमच्या माता-भगिनी त्याच्या तिप्पट आल्या. त्यासाठी तेरा गाव कोळी संघटनेचे अभिनंदन.

मच्छिमारांचा विषय आहे. आपण जो १५०० मीटरचा बांध बांधणार आहेत, त्याच्यामुळे भरती-ओहोटी बदलून जाणार आहे. मोठ्या उधाणाला तेरा गावातील रोहापासून पावसाचे पाणी शिरणार आहे. त्यामुळे खारे पाणी व पावसाचे पाणी मिसळून प्रत्येकाच्या घराघरात शिरणार आहे. घरे नष्ट होतील. तेरा गाव कोळी समाजाचा या प्रकल्पास विरोध,

५१) **<u>श्री शेलार यांनी सांगितले की :-</u>**

प्रकल्पाच्या विरुध्द सर्व तेरा गाव कोळी संघटनेच्या विरुध्द जे वकिल आले व त्यांनी बाजू मांडली त्यांना सांगण्यात येते की २०२६ ला आपण जो ठराव कराल,

तोच सर्वांनाच मान्य असेल. जसे २०१७ ला प्रकल्पाला कुलुप लावले, तसेच २०२६ ला या अदानी प्रकल्पाला कुलुप लावावे.

त्यांनी विधिज्ञांना विनंती केली की या प्रकल्पास ना हरकत प्रमाणपत्र व पर्यावरण अनुमती कसे मिळणार नाही, याबाबत पुढील पाऊले उचलण्यात यावीत.

अध्यक्ष यांना सादर करण्यात येते की येथील सर्व गावातील ग्रामस्थांचा या प्रकल्पास विरोध आहे.

५२) **<u>एडव्होकेट कांदेकर:-</u>**

अध्यक्षमहोदय, याबाबत एक धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. मरीआई मच्छिमार कृत्ती समितीबाबत एक निर्णय आहे.

तसेच महाराष्ट्र शासनाने प्रकल्पबाधितांसाठी मोबदला देणे याबाबत धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.

येथे त्यावेळी सर्व उपस्थितांनी एकत्रितपणे प्रकल्पच नको तर मोबदल्याचा प्रश्नच येत नाही असे विचार उद्‌गारले.

<u>एडव्होकेट कांदेकर यांनी</u> मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी या बैठकीचा समारोप करण्याची विनंती केली

५३) **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** सूचना केली की पर्यावरण सल्लागार यांनी उपस्थित केलेल्या सूचना,आक्षेप याबाबत निवेदन करावे.

५४) **पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की** प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी उपस्थित केलेल्या सूचना, हरकती,आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच जे लेखी स्वरुपात सूचना, हरकती, आक्षेप नोंदविण्यात आले, त्यांना त्या त्या व्यक्तींना लेखीस्वरुपात उत्तरे ही प्रकल्प प्रवर्तक व पर्यावरण सल्लागार यांच्याकडून देण्यात येतील.

५५) **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** बैठकीचा समारोप करताना सांगितले की बैठकीत चर्चेदरम्यान काही विषय उपस्थित करण्यात आले. त्यात काही विषय खालीलप्रमाणे-

अ)	प्रकल्पापासून जवळच ऐतिहासिक स्थळ - मुरुड येथील जंजिरा किल्ला आहे. त्यासाठी प्रकल्पाचे काम करण्याअगोदर ना हरकत प्रमाणपत्र (एन.ओ.सी.) प्राप्त करण्यात आलेली नाही,
ब)	प्रकल्प प्रभावित गावांमध्ये दिघी पोर्ट लिमिटेडने कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधी सामाजिक उपक्रमांसाठी वापरलेला नाही,
क)	दिघी जेट्टीबाबत अहवालात माहिती दिलेली नाही,
ड)	दिघी पोर्ट लिमिटेडने २००८ साली १३ (तेरा) कोळीवाड्यांसोबत सामंजस्य करार केला. त्या सामंजस्य करारात करण्यात आलेल्या अटी व शर्तींची पूर्तता अद्यापपावेतो करण्यात आलेली नाही.
इ)	PIL No. 42/2009. मा. उच्च न्यायालय, मुंबई -उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दिघी गावाला शंभर टँकर्स रोज पुरविणे बंधनकारक असतानाही प्रकल्प प्रवर्तक यांनी पाणी पुरवठा केलेला नाही. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केले.
ई)	मँग्रोस तोडताना उच्च न्यायालयाची पूर्वपरवानगी लागते,ती घेण्यात आलेली नाही

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आम्ही कोणाच्याही बाजूचे नाही. आम्ही शासनाच्या वतीने ही जनसुनावणी आयोजित करण्यासाठी व आपण प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेल्या पर्यावरणीय सूचना/हरकती नोंदविण्यासाठी आहोत. बैठकीच्या इतिवृत्तासोबत सर्व दस्तावेज हा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या सहीने

मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्यातर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय,भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी सर्वांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले एकूण ९६ सूचना/आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

(संदीप टोपे)
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
महाड,
(अतिरिक्त कार्यभार)

(संजय भोसले)
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड,
नवी मुंबई

(संदेश शिर्के)
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,अलिबाग,
जिल्हा - रायगड